रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक २०५ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. २३ डिसेंबर २०२४

किंमत ४ ₹


## जीएसटी परिषदेची बैठक संपन्न

**राजस्थान** : राजस्थानच्या जैसलमेर येथे जीएसटी (वस्तू व सेवा कर) परिषदेची ५५ वी बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत पॉपकॉर्नवर कर लावण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. परिषदेने पॉपकॉर्नच्या फ्लेवरनुसार (चवीनुसार) त्यावर कर आकारण्याचा निर्णय घेतला आहे. याचाच अर्थ वेगवेगळ्या फ्लेवरच्या पॉपकॉर्नवर वेगवेगळा जीएसटी आकारला जाईल. जीएसटी परिषदेच्या या बैठकीवेळी आरोग्य व जीवन विमा हप्त्यावरील वस्तू आणि सेवा करात सूट अथवा त्यात कपात करण्याचा निर्णय घेतला जाईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र, जीएसटी परिषदेने हा निर्णय लांबणीवर टाकला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या पान २ वर

## दाट धुक्याने विमानसेवा कोलमडली

**पुणे** : सध्या थंडीचा तडाखा संपूर्ण महाराष्ट्रभर पाहायला मिळत आहे. पुणे जिल्हा ही याला काही वेगळा नाही. पुण्यातही गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर थंडी पाहायला मिळत आहे. अशातच शनिवारी धुक्याची चादर पसरली होती याचा रस्ते वाहतुकीसोबतच विमानसेवेवरही परिणाम झाला. तब्बल २२ विमानाच्या उड्डाणांना उशीर झाला. त्यामुळे प्रवाशांचे हाल झाले. पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे शनिवारी पडलेल्या दाट धुक्याचा सकाळी ६ ते दुपारी १२ दरम्यान २२ विमानांना याचा फटका बसला आहे. धुक्यामुळे अर्ध्या तासापासून ते तीन तासांपर्यंत विमानांच्या उड्डाणाला उशीर झाल्याचे दिसून आले.

## गोगावलेंचा तटकरेंशी पुन्हा संघर्ष

# पालकमंत्रीपदासाठी लॉबिंग

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच १५ डिसेंबरला मंत्रिमंडळ विस्तार झाला. पण खातेवाटप जाहीर झालं नव्हतं. २१ डिसेंबरच्या रात्री खातेवाटप जाहीर झालं. खातेवाटप जाहीर होताच रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदावरुन दावे केले जात आहेत. महायुतीमधील शिंदे शिवसेना आणि अजित पवार राष्ट्रवादी हे दोन घटक पक्ष पुन्हा एकदा पालकमंत्रीपदाच्या शर्यतीसाठी सज्ज झाले आहेत. आदिती तटकरे यांनी पालकमंत्रीपदासाठीची इच्छा बोलून दाखवलेली नाही. शिवसेनेचे भरत गोगावले यांनी रायगडचं पालकमंत्रीपद आपल्याला मिळेल अशी आशा व्यक्त केली आहे. दोघांच्या भांडणात रायगडच्या पालकमंत्रीपदाची माळ तिसऱ्याच्याच गळ्यात पडणार असा अंदाज राजकीय जाणकारांनी व्यक्त केला आहे.**

मला मंत्रिपद मिळाल्याने मी समाधानी आहे. मुंबईत आल्यानंतर आम्ही सगळेच बाळासाहेब ठाकरेंच्या स्मृती स्थळी गेलो होतो. तिथे जाऊन आम्ही दर्शन घेतलं. यानंतर आम्ही आता बाळासाहेब भुवन या ठिकाणी आलो आहोत. मी आनंदी आहे, तसंच आमचे कार्यकर्तेही उत्साहात आहेत अ स ं भरत गोगावलेंनी म्हटलं आहे. रायगडच्या



### शिंदे शिवसेना गट आक्रमक भूमिकेत

पालकमंत्रिपदावर आमचा दावा असणार आहे, त्याची काही काळजी करु नका ते देखील होईल असं सूचक वक्तव्य भरत गोगावलेंनी केलं आहे.

महाविकास आघाडीच्या काळात आदिती तटकरे या रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री होत्या. त्यावेळी शिवसेना आमदार भरत गोगावले, महेंद्र दळवी आणि महेंद्र थोरवे यांनी त्यांच्याविरोधात भूमिका घेतली होती. तसंच भरत गोगावले आणि सुनील तटकरे यांच्यातील वादही तेव्हा समोर आला होता. महायुतीचं सरकार जेव्हा राज्यात आलं तेव्हा म्हणजेच २०२२ मध्ये उदय सामंत यांच्याकडे रायगडचं पालकमंत्रीपद गेलं. त्यानंतर २०२३ मध्ये अजित पवारही त्यांच्या आमदारांसह महायुतीत सहभागी झाले. आता रायगडच्या पालकमंत्री पदावरुन रस्सीखेच पाहण्यास मिळते आहे. भरत गोगावले हे रायगडच्या पालकमंत्री पदाचे दावेदार मानले जात आहेत. मात्र खासदार सुनील तटकरे हे त्यांच्या कन्या आणि मंत्री आदिती तटकरेंना हे पद मिळावं यासाठी आग्रही आहेत. आता या सगळ्या दरम्यान नेमकं काय होतं ते पाहणं महत्त्वाचं असणार आहे. दरम्यान खातेवाटप जाहीर होताच भरत गोगावले यांनी पालकमंत्री पदावर दावा सांगितला आहे.

२०१९ ला दळवी, भरत गोगावले आणि मी असे शिवसेनेचे तीन आमदार निवडून आले होते. तरीही उद्धव ठाकरे यांनी स्वतःला मुख्यमंत्री व्हायचे होते म्हणून, राष्ट्रवादीच्या एकमेव आमदारांना पालकमंत्री केले. त्यामुळे पुढील काळात झालेल्या बंडखोरीत आम्ही तिनही आमदारांनी एकनाथ शिंदेंसह ठामपणे उभं राहण्याचा पान २ वर

# सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा

## ■ कॅगचे आरोग्य यंत्रणेवर ताशेरे

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



राष्ट्रीय आरोग्य धोरणानुसार राज्याच्या एकूण अर्थसंकल्पाच्या ८ टक्के निधी सार्वजनिक आरोग्यावर खर्च होणे अपेक्षित असतानाही राज्यात केवळ ४.९१ टक्के निधी खर्च केला जात आहे.

गेल्या पाच वर्षांत (२०१६-१७ ते २०२१-२२) अर्थसंकल्पीय तरतूदीमध्ये जेमतेम ०.८२ टक्के अशी किरकोळ वाढ झाली. परिणामी डॉक्टर, परिचारिका तसेच रुग्णालयीन कर्मचाऱ्यांची ४२ टक्के रिक्त पदे, लोकसंख्येच्या तुलनेत रुग्णालये, आरोग्य केंद्रांची कमतरता आणि रुग्णालयांची दुरावस्था यामुळे राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचा ठपका भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांच्या (कॅग) अहवालच ठेवण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधा आणि आरोग्य सेवांचे व्यवस्थापन यासंदर्भातील कॅगचा लेखापरीक्षा अहवाल शनिवारी विधिमंडळात सादर करण्यात आला. यात राज्यातील आरोग्य व्यवस्थेबाबतची सरकारी अनास्था कॅगने उघड केली. तसेच आरोग्य विभातील पदे तातडीने भरावीत, लोकसंख्येचा विचार करून पदवाढ करावी, निधी उपलब्ध करून द्यावा तसेच सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यावर भर देण्याची शिफारसही कॅगने या अहवालात केली. जागतिक आरोग्य परिषदेच्या डॉक्टर-लोकसंख्येच्या निकषानुसार राज्यात पान २ वर

**आजचा अग्रलेख**

**आटपलेले वाटप**

**वेधक**

## वडाळ्यात कारने मुलाला चिरडले

**मुंबई** : मुंबईत वडाळ्यातील आंबेडकर कॉलेजजवळ एका कारनं चार वर्षाच्या चिमुकल्याला चिरडलं आहे. या अपघातात चिमुकल्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर आरोपीने घटनास्थळावरून लगेच पोबारा केला. हिट अँण्ड रनच्या या घटनेनंतर नागरिकांकडून हळहळ व्यक्त केली जाते आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भूषण संदीप गोळे असं आरोपीचं नाव आहे, तर आयुष लक्ष्मण किनवडे असं मृत चिमुकल्याचं नाव आहे. आरोपी भूषण विलेपार्ले येथील रहिवासी असून तो पान २ वर

## दुकानासमोर गोळीबार, कामगाराचा मृत्यू

**ठाणे** : शहापूरमध्ये गोळीबारात कामगाराचा मृत्यू झाला आहे. पंडित नाक्यावरील महालक्ष्मी ज्वेलर्समध्ये काम करणाऱ्या दिनेशकुमार चौधरी (२५) रा.शहापूर याच्यावर २१ डिसें रोजी रात्री ८.३०च्या दरम्यान अज्ञात इसमानी गोळीबार केल्याने ते जखमी झाले होते. त्यांच्यावर ठाणे येथील खाजगी दवाखान्यात उपचार सुरू असताना २२ डिसें रोजी सकाळी त्यांचा मृत्यू झाली असल्याची घटना घडली असून याप्रकरणी शहापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी मिलिंद शिंदे व पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकूर यांनी घटनास्थळी भेट दिली. पुढील तपास पोलीस सुरु आहे. या हल्ल्याच्या विरोधात तालुक्यातील सर्वच व्यापारी संघटनांनी निषेध व्यक्त केला असून आरोपींना अटक करण्याची मागणी केली आहे.

## रिक्षाला अपघात; एक ठार

**। खोपोली । प्रतिनिधी ।**





मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर आसरेवाडीजवळ एका रिक्षाला अज्ञात वाहनाने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने रिक्षाने समोरील चालणाऱ्या जैन साधूच्या टीमला जोरदार धडक दिल्याने त्यातील एका तरुणाला जोरदार दुखापत होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात त्या तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे.

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरून रिक्षा चालक महेंद्र शंकर कदम हा आपली रिक्षा मुंबईकडे घेऊन जात असताना तो खालापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत आसरेवाडी जवळ आला असता रिक्षाला पाठीमागून अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. यामुळे रिक्षाने रस्त्याच्या बाजूने चालणाऱ्या जैन साधूना जोरदार धडक दिली. जैन साधूसोबत चालणारे विनोद जैन या तरुणाला गंभीर दुखापत झाली. त्याला तात्काळ पुढील उपचारासाठी चौक ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता त्याला डॉक्टरांनी मृत घोषित केले. या अपघातात अन्य कोणत्याही साधूंना कोणतीही दुखापत झाली नसून रिक्षाचे नुकसान झाले आहे.

# पायलट प्रोजेक्टनंतर ई-रिक्षा कायम धावणार

**। माथेरान । वार्ताहर ।**

डिसेंबरमध्ये ई-रिक्षाच्या पायलट प्रोजेक्टला सहा महिने पूर्ण होत असून ह्यानंतर ही सेवा बंद होणार असल्याच्या अफवांना पेव आला होता. त्यासाठी सर्व ई-रिक्षा चालकांनी मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या दालनात बैठक घेऊन याबाबत सविस्तर माहिती घेतली.

सर्वोच्च न्यायालयाने सनियंत्रण समितीकडे या प्रोजेक्टबाबत अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. हा पायलट प्रोजेक्ट सुरू करताना माथेरानमधील रस्त्यावर ई-रिक्षा तीनही ऋतूत चालू शकतात का यासाठी हा पायलट प्रोजेक्ट कार्यान्वित करण्यात आला होता आणि तो प्रोजेक्ट या डिसेंबरमध्ये





पूर्ण होत आहे. मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी ई-रिक्षा सेवा सुरळीत सुरू राहील याची ग्वाही दिली.

सनियंत्रण समितीने २० परवानाधारक हात रिक्षा चालकांना ई-रिक्षाची परवानगी दिली त्यांनी १० जूनपासून ई-रिक्षा सेवा सुरू केली. यावर्षी मोठ्या प्रमाणात माथेरानला पाऊस झाला ६५५० मिमी इतका मुसळधार पावसातदेखील ई-रिक्षा बंद न पडता सुरळीत चालल्या या २० हात रिक्षा चालकांनी बँकेतून कर्ज काढून ई-रिक्षा विकत घेतल्या आहेत. त्यामुळे दरमहिना कर्जाचे हफ्ते भरावे लागतात. मुख्याधिकारी यांच्या पान २ वर

# बांगलादेशातील घडामोडीचा फटका बंगाली नागरिकांना

**। पनवेल ग्रामीण । वार्ताहर ।**

बांगलादेशात घडत असलेल्या राजकीय घडामोडी मुळे वातावरण तसपले आहे. बांगलादेशात अल्पसंख्यांक हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराचे पडसाद भारतात उमटू लागले आहेत. याचा फटका देशातील पश्चिम बंगाल राज्यातून महराष्ट्रात नोकरी धंदा करण्यासाठी आलेल्या बंगाली भाषीक नागरिकांना बसत असून, सर्वच बंगाली भाषिकांकडे बांगलादेशी असल्याच्या नजरेने पाहिले जात आहे.

देशातील इतर राज्यातून महाराष्ट्रात नोकरी धंद्यानिमित्त येणाऱ्यानमध्ये पश्चिम बंगाल मधून येणाऱ्या बंगाली भाषिक नागरिकांची संख्या मोठी आहे. मिळेल ते काम

> **बंगाली भाषिक असल्याचे कारण पुढे करून सध्या आमच्या व्यवसायावर कारवाई केली जात आहे.भारतीय असूनही आमच्या विरोधात केल्या जात असलेल्या या कारवाईमुळे आमच्या परिवाराच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे.**
>
> **- इम्रान खान.**
> **फळ व्यावसायिक**

करून आपला उदरनिर्वाह करणारे हे नागरिक वेळ प्रसंगी पडेल ते काम करत असल्याने विविध क्षेत्रात बंगाली भाषिक नागरिकांनी आपली मक्तेदारी निर्माण केली आहे. नवी मुंबई परिसरात घरकाम करणाऱ्या महिलांमध्ये पान २ वर

## मुंबई-गोवा महामार्गावर धावत्या बसला आग

**। कोलाड । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील कोलाड रेल्वे पुलाखाली लक्झरी बसणे अचानक पेट घेतला असून, नागरिकांच्या अथक प्रयत्नाने तसेच अग्निशामक दलामुळे आग आटोक्यात आली असुन या आगीत कोणतेही जीवितहानी झाली नसल्याने मोठा अनर्थ टळला.

शनिवारी (दि. २१) रात्री १२.०० च्या सुमारास लक्झरी बस गाडी क्र. एम एच ४७ ए एस ६००३ ही बस बोरिवलीहुन मालवणच्या दिशेने जात असतांना कोलाड रेल्वे पुलाखाली आली असता गाडीने अचानक पेट घेतल्याचे बस चालकाच्या लक्षात येताच बस चालकाने बस थांबवली व क्लिनरने बसमधून उतरून पाहिले असता गाडीने पेट घेतल्याचे लक्षात आले.



**सुदैवाने ३४ प्रवासी बचावले**

यामुळे बसमधील असणारे ३० प्रवाशी, दोन चालक, दोन कर्मचारी यांना खाली उतरण्यात आले.

धाटाव एमआयडीसी, दीपक नायट्रेट कंपनी यांचे अग्नीशमन दल, कोलाड रेस्क्यू टीम आणि पोलीस यांनी बचाव कार्य केले व आगीवर नियंत्रण आणले.

बसमध्ये चालक आणि क्लिनरसह ३४ प्रवासी होते. खापरोबा ट्रॅव्हल्सची ही एसी स्लीपर कोच बस मुंबईतील जोगेश्वरी येथून मालवणकडे निघाली होती. कोलाड रेल्वे पुलाजवळ आली असता बसच्या मागील बाजूस मोठा आवाज झाला. तेव्हा चालकाने गाडी थांबवून पाहिले असता बसने मागील बाजूस पेट घेतल्याचे दिसले. तातडीने बसमधील सर्व प्रवाशांना खाली उतरवण्यात आले.

## कुत्र्यांवर सट्टा; ८१ जणांना अटक

**राजस्थान** : राजस्थानच्या हनुमानगडमध्ये विदेशी जातीच्या कुत्र्यांवर सट्टा खेळला जात असल्याची बाब उघडकीस आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी ८१ जणांना अटक केली आहे. राजस्थान पोलिसांनी शुक्रवारी रात्री एका फार्म हाऊसवर छापा टाकला. छापा टाकल्यानंतर काहीजणांनी कुत्र्यांवर सट्टा लावल्याचा प्रकार समोर आला. या प्रकरणात पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या ८१ जणांवर सट्टेबाजीचा आरोप करण्यात आलेला आहे. हनुमानगड पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील एका फार्म हाऊसवर हा सर्व प्रकार सुरु होता. पोलिसांनी छापा टाकल्यानंतर पोलिसांनी विदेशी जातीचे तब्बल १९ कुत्रे आणि १५ वाहने जप्त केली आहेत.

# बोर्डाचे विद्यार्थी टेन्शन फ्री

## । परीक्षेची सर्व माहिती देणारे ॲप लॉन्च

**। रायगड । प्रतिनिधी ।**

विद्यार्थी आणि पालकांना दहावी, बारावी परीक्षेचे वेळापत्रक, परीक्षाविषयक माहिती व परिपत्रके यांची माहिती मिळावी, यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मोबाईल ॲप विकसित केले आहे. एमएसबीएसएचएसई या नावाच्या ॲपमुळे दरवर्षी बोर्डाच्या परीक्षांबात विद्यार्थ्यांत निर्माण होणारे संभ्रम दूर होणार आहेत.

दरवर्षी बोर्डाच्या परीक्षांबाबत विद्यार्थ्यांत संभ्रम असतात. सोशल मीडियावर याबाबत अफवाही पसरवल्या जातात. चुकीचे वेळापत्रक पसरवण्याचे प्रमाणही वाढले आहे. पान २ वर





**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने ॲप उपलब्ध करून दिले आहे. ते दहावी, बारावी विद्यार्थ्यांसह संस्था व कर्मचाऱ्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे. या ॲपमुळे परीक्षा वेळापत्रक, नियम याबाबत संभ्रम निर्माण करण्याच्या प्रयत्नांना आळा बसणार आहे. शिवाय विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसाठी अनेक सुविधा ऑनलाईन उपलब्ध होणार आहेत. विद्यार्थ्यांनी हे ॲप मोबाईलवर इन्स्टॉल करुन या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.**

## महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कलागुणांनी मिळविली दाद

# महागायकाच्या सुरांनी गुंजला पीएनपीचा प्रभाविष्कार

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अवधूत गुप्ते प्रस्तुत पावनखिंड या सिनेमातील गाणं 'राजं आलं, राजं आलं, जिंकूनी या जगभरी' 'शिवबा राज' नाव गाजं जी... या गाण्याने सुरुवात केली आणि रसिक प्रेक्षकांची मने महाराष्ट्राचा महागायक अभिजीत कोसंबी यांनी जिंकून सर्वांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमात त्यांनी विविध गाणी गाऊन प्रेक्षकांना आणि विद्यार्थ्यांना गुलाबी थंडीत मनमोहक आनंद दिला. एकापेक्षा एक सरस गाण्यांचा नजराणा अभिजित कोसंबी यांनी सादर केला. त्यांच्या या सादरीकरणाला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपापल्या कला आविष्काराने उत्तम साथ दिली.





प्रभाविष्काराच्या समारोपावेळी सादर झालेल्या महागरब्याने प्रभाविष्काराच्या सादरीकरणात वेगळीच रंगत आणली.

पीएनपी वेश्वी शैक्षणिक संकुलाद्वारे प्रभाविष्कार या सांस्कृतिक सोहळ्याचे १८ ते २१ डिसेंबर या दरम्यान आयोजन करण्यात आलेले होते. प्रभाविष्कार २०२४ अंतर्गत कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचा सांगता समारंभ २१ डिसेंबरला महाराष्ट्राचा महागायक अभिजीत कोसंबी यांच्या उपस्थितीत पार पडला. या सोहळ्यास संस्थेच्या कार्यावह चित्रलेखा नृपाल पाटील,युवराज पाटील, बीड, केज येथील शेकाप राज्य चिटणीस मंडळ सदस्य भाई मोहन गुंड, रायगड जिल्हा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, डॉ. राजेंद्र चांदोरकर, विविध ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य तसेच पत्रकार व इतर मान्यवरांसह कॉलेजचे संचालक विक्रांत वार्डे, कॉलेजचे प्र. प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, प्राचार्य रविंद्र पाटील, डॉ. नम्रता पाटील, डॉ. रसिका म्हात्रे, मुख्य कार्यालयाचे पदाधिकारी तसेच राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, आरोग्य, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, सर्व शाळांचे मुख्याध्यापक, विद्यार्थी, पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

कला क्षेत्रात वावरताना मी आज ज्या उंचीवर पोहचलो आहे. त्यामध्ये अलिबागकरांचा मोलाचा वाट आहे. अलिबाग मधील अनेक कलाकारांचा संपर्क महागायक पान २ वर

## परप्रांतियाकडून अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**। डोंबिवली । प्रतिनिधी ।**

कल्याणमध्ये पुन्हा एकदा परप्रांतियांची दादागिरीची घटना समोर आली आहे. परप्रांतीय व्यक्तीने एका अल्पवयीन मुलीचा विनयभंग केला. उत्तम पांडे असे त्या व्यक्तीचे नाव आहे. पांडे याला जाब विचारण्यासाठी गेलेल्या मराठी कुटुंबाला पांडे व त्याच्या पत्नीने मारहाण केल्याची घटना घडली आहे. या मारहाणीची घटना सीसीटीव्ही मध्ये कैद झाली असून याप्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कल्याणजवळील आडीवली ढोकळी परिसरात एका अल्पवयीन मुलीशी उत्तम पांडे याने अश्लील चाळे करत तिचा विनयभंग केल्याचा आरोप पिडीत मुलीच्या पालकांनी केला आहे. शनिवारी रात्री १० च्या सुमारास पीडित मुलगी घरासमोर खेळत असताना पांडे याने तिला घरात ओढून तिच्यासोबत गैरवर्तन केले. मुलीने सदर घटना आपल्या वडिलांना सांगितली. वडिलांनी पांडे याच्या घरी जाऊन त्याला जाब विचारण्यास सुरुवात केली. यावेळी पांडे याने तिच्या वडिलांशी वाद घालण्यास सुरुवात करत मारहाण केली. पीडित मुलीच्या आजीने मुलीच्या आईला हे सांगताच ती देखील घरी आली. तिला सगळा प्रकार समजताच तिने जाब विचारताच पांडे याची पत्नी रिना हिने मुलीची पान २ वर

# कर्जत चारफाटा ठरतोय वाहतूक कोंडीचा हॉट स्पॉट

## उड्डाण पूल बांधण्याची मागणी



**। नेरळ । प्रतिनिधी ।**
**मुंबई पुणे येथून कर्जत तालुक्यात येणारे पर्यटक, वाहनचालक तसेच स्थानिक यांची चार फाटा येथे मोठी गैरसोय तेथे दररोज होणाऱ्या वाहतूक कोंडीमध्ये अडकून होत असते. कर्जत चार फाटा येथील वाहतूक कोंडी रोखण्यासाठी उड्डाण पुल बांधण्याची मागणी वाहनचालक करीत आहेत. कर्जत चार फाट्यावर चारही बाजूला जाणारा प्रशस्त उड्डाणपूल होणे काळाची गरज बोलली जात आहे.**

प्रत्येक शनिवारी आणि रविवारी कर्जतला फार्म हाऊस आणि माथेरानला पर्यटनासाठी येणाऱ्या गाड्यांची रहदारी वाढतच आहे. तसेच कर्जतला कर्जत - पनवेल रेल्वे टर्मिनस चार फाट्याजवळ होत आहे. आगामी वर्षभरात चार फाट्याजवळील रेल्वे स्थानक चालू झाल्यास या ठिकाणी प्रचंड वर्दळ चालू होईल. त्यामुळे आगामी काळात चार फाट्याला प्रचंड वाहनकोंडी होणार आहे.

कर्जतमधील शाळेतील मुलांना आणि रहिवाशी यांना ही चार फाट्या वरून दैनंदिन प्रवास करण्यास रहदारीचा प्रचंड त्रास सहन करावा लागेल.

आगामी काळात असा वाहनकोंडीचा आणि रहदारीचा त्रास कमी करण्याची मागणी केली जात आहे.कर्जत चार फाट्याजवळ चार ही बाजूला जाण्याची सोय असणाऱ्या उड्डाणपुलाची अत्यंत निकडीची गरज व्यक्त होत आहे.

## हरिश्चंद्र पाटील यांचा मृत्यू

**नवीन पनवेल :** टँकरने स्कुटीला दिलेल्या धडकेत बोरले येथील हरिश्चंद्र महादेव पाटील (वय ५६) यांचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी टँकर चालक रावेंद्र उदयराज सिंग (रा. नागोद, सतना, मध्य प्रदेश) याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पनवेल तालुक्यातील बोरले- अजिवली येथील हरिश्चंद्र महादू पाटील हे २१ डिसेंबर रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास आपल्या ताब्यातील स्कुटीवरून जुना पुणे मुंबई हायवेने जेएनपीटीकडे जाणाऱ्या लेनवर देवनारायण इलेक्ट्रॉनिक दुकानाच्या समोर, कोळखेगाव बस स्टॉप येथे आले. यावेळी पाठीमागून आलेल्या टँकरने भरधाव वेगाने वाहन चालवले आणि स्कुटीला पाठीमागून ठोकर मारली. या अपघातात डोक्यावरून चाक गेल्याने हरिश्चंद्र महादू पाटील यांचा जागीच मृत्यू झाला. पनवेल शहर पोलिसांनी आरोपी रावेंद्र सिंग यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला.



## गोखले महाविद्यालयाचे एनएसएस शिबीर

**। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।**
गोखले शिक्षण संस्था संचलित, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सात दिवसीय हिवाळी निवासी शिबीर दि. १५ ते २१ डिसेंबर या कालावधीत रायगड जिल्हा परिषद शाळा मेघरे-भरडोल येथे आयोजित करण्यात आले होते.

गोखले महाविद्यालयाने हे गाव सलग तीन वर्षे दत्तक घेतले होते. या शिबिराचे आयोजन मुंबई विद्यापीठ, रायगड जिल्हा समन्वयक, प्रा. तुळशिदासमोकलवमहाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली व उपप्राचार्य व एनएसएस कार्यक्रम अधिकारी, प्रा. श्री. किशोर लहारे आणि प्रा. नवज्योत जावळेकर यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाले. या शिबिरात सुमारे ७५ विद्यार्थी -स्वयंसेवक सहभागी झाले होते.

या शिबिरात दररोज, वैयक्तिक स्वच्छता, प्रार्थना, एनएसएस गीत, योग व व्यायाम, सुविचार लेखन, गट चर्चा, चहापान, श्रमदान, भोजन, विश्रांती, सर्वेक्षण, व्याख्यान व प्रबोधन, सांस्कृतिक कार्यक्रम, अनुभव कथन, दैनंदिनी लेखन, कॅम्प फायर इ. नियोजित कार्यक्रमांबरोबरच ग्राम स्वच्छता अभियान, आरोग्य तपासणी, व्यसन मुक्ती, व्यक्तिमत्त्व विकास, अंधश्रद्धा निर्मूलन, स्पर्धा परीक्षा, पाणी व्यवस्थापन, वृक्ष संवर्धन, पथनाट्य प्रबोधन, ग्राम सर्वेक्षण, महिला सबलीकरण असे विषेश कार्यक्रम संपन्न झाले. या शिबिरासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर.पी.देशपांडे, प्राचार्या. डॉ.दिप्ती देशपांडे यांचे मार्गदर्शन व आशिर्वाद लाभले. शिबीर यशस्वी झाल्याने स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य नितीन सुर्वे, शांतीलाल जैन, राजेंद्र भोसले यांनी कौतुक केले आहे.

## चौघांवर केला गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** लाकडी दांडक्याने आणि मोटरसायकलच्या सॉकपसरच्या रॉडने मारहाण करून ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या चौघांवर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अरुण धोत्रे, साहिल धोत्रे, मुन्ना बागवान आणि बबलू साळुंखे अशी आरोपींची नावे आहेत.

रईस लाला सय्यद हा १८ डिसेंबर रोजी घराच्या समोर अंगणात झोपलेला असताना त्याच्या भाच्याला काही मुले मिळून मारहाण करत होती. यावेळी उमेर शेख याला अरुण धोत्रे, साहिल धोत्रे, मुन्ना बागवान, बॉबी उर्फ बबलू साळुंखे मारत होते. रईस भांडण सोडवण्यासाठी गेला असता साहिल धोत्रेने त्याच्या डोक्यात मोटरसायकलच्या सॉकपसरच्या रॉडने उपट मारली. त्यानंतर अरुण धोत्रे, मुन्ना बागवान, बॉबी उर्फ बबलू याने लाकडी दांडक्याने मारहाण केली. या मारहाणीत त्याच्या डोक्याला जखम झाली आणि तो चक्कर येऊन जमिनीवर खाली पडला. यावेळी त्याची दुचाकीचे देखील त्यांनी तोडून नुकसान केले.

# गझल मुशायरा मैफिल संपन्न



**। माणगाव । वार्ताहर ।**
ललित कला फाउंडेशन , ठाणे यांनी आयोजित केलेल्या काव्य, गझल मुशायरा महफिल -ए -सुखन आणि कवितेच्या घरातर्फे कवितेवर बोलू काहीचा उपक्रम म्हसळा, जिल्हा रायगड येथील न्यु इंग्लिश स्कुलच्या सभागृहात संपन्न झाला.

अध्यक्ष रोहिदास पोटे व उद्‌घाटक शिवशाहीर कमलाकर करडे आणि मुज्फर गफुर सय्यद यांची भाषणे व मनोगत यांनी कार्यक्रमाला सुरुवात करून दिली.

राणा दौड, राजू आठवले व नायाब नागेश नायडू यांनी मंत्रमुग्ध केले. राना दौड यांनी धर्म नेसला सोवळे पुन्हा एकदा, श्री आठवलेची जीवना मी तुला सोसले जेव्हढे, नागेश नायडूची गुरू द्रोण पक्का दगलबाज आहे. कौशल यांनी राजकारण्यावरील शब्दांचे तर पक्के होते आणि अध्यक्ष व्यंकटेश कुलकर्णीची ही न्यारी फकिरी या गझलांनी रंगत आणली. यावेळेस परिसरातील गुणीजन रवींद्र लाड, कमलाकर करडे, यादव व पर्यावरण सेवक सूर्यतळ यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

खेडोपाडी, विद्यार्थ्यांत कवितेची गोडी लावणारे कवितेचे घर आणि हिंदी -मराठी गझलकार प्रसिद्धीस आणणे. नवीन गझल गायक शोधून काढणारे ललित कला फाउंडेशन यांचे हे उपक्रम म्हसळाकरांना खुप आवडला.

यासारखे उपक्रम चिपळूण, दापोली, रत्नागिरी येथे कारणार असल्याचे दिलीप कारखानीस, अध्यक्ष ललित कला फाउंडेशन आणि कार्याध्यक्ष सोमीनाथ सारोलेकर यांनी सांगितले.

# प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन

**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**
अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरुड जंजिरा मध्ये प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली वनस्पती शास्त्र व प्राणीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवशीय वनस्पती उती संवर्धन प्रात्यक्षिके व प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन २० ते २२ डिसेंबर २०२४ या कालावधीत करण्यात आले आहे.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यशाळेचे उदघाटन संपन्न झाले. उद्‌घाटनसमयी आपल्या भाषणातून सहभागी प्रशिक्षणार्थीना उती संवर्धनाचे फायदे नमूद करून त्यामध्ये संशोधन करण्याचे आवाहन केले. या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक म्हणून डॉ. दक्षयिनी सहाय्यक प्राध्यापक अलॉयसिस (डीम टू बी युनिव्हर्सिटी), कर्नाटक यांची लक्षणीय उपस्थिती आहे. सहभागी विद्यार्थ्यांना त्या तीन दिवसामध्ये वनस्पती उती संवर्धन प्रात्यक्षिके व प्रशिक्षण देणार आहेत.

या कार्यशाळेत ४० प्रशिक्षणार्थी सहभागी झाले आहेत. सादर प्रशिक्षण कार्यशाळा यशस्वी पूर्ण करण्यासाठी वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. रहीम बागवान आणि प्राणिशास्त्र विभागाचे प्रा. जावेद मनियार हे काम पाहत असून सहभागी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

# ग्रामस्थ बसणार उपोषणाला

**। कोलाड । वार्ताहर ।**
आंबेवाडी ग्रामपंचायतीची ग्रामसभा घेण्यात आली. या ग्रामसभेत आंबेवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर उपलब्ध व्हावा तसेच मुंबई गोवा हायवेचे काम ग्रामस्थांच्या मागणी नुसार करण्यात यावा असा ठराव आंबेवाडी ग्रामसभेत घेण्यात आला.

यावेळी प्रशासक अधिकारी एस.एन.गायकवाड, ग्रामपंचायत अधिकारी डी.यु पाबरेकर, माजी सरपंच सुरेश महाबळे, प्रितम पाटील, कुमार, संजय कुर्ले, महेंद्र वाचकवडे, श्रीकांत चव्हाण, अविनाश पलंगे, भरत सातांबेकर, डॉक्टर वाघ, अंगणवाडी सेविका उपस्थित होते

मुंबई-गोवा महामार्गाला लागून असणारे आरोग्य केंद्र आहे. या ठिकाणी अनेक अपघाताचे रूग्ण व परिसरातील नागरिक वैद्यकीय सेवा घेण्यासाठी येत असतात. येथे तीन डॉक्टरची आवश्यकता असताना येथील आरोग्य केंद्रात एकच डॉक्टर असल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे.दवाखान्यातील कर्मचारी उपलब्ध नसतात. वातावरणात बदल झाल्याने नागरिकांना होणाऱ्या त्रासावर सर्दी खोकल्याचे औषधे उपलब्ध नाहीत. याविषयी ग्रामसभेत ठराव घेण्यात आला.

मुंबई-गोवा महामार्गावरील पनवेल ते इंदापूर दरम्यानच्या चौपदरी करण्याचे काम सुरु असुन आंबेवाडी बाजारपेठेतील उड्डाणपुलाचे काम सुरु आहे. हा उड्डाण पूर्णपणे पिलरवर असावा. सन १९८९ व २००५ मध्ये पुरामध्ये निर्माण झालेली पूरस्थिती निर्माण होऊ नये. यासाठी आंबेवाडी ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यावर पूर्णपणे उड्डाणपूल असावा जेणेकरून पुरस्थितीचा धोका होऊ नये. यासाठी ग्रामस्थांची जनसुनावणी लावून नागरिकांची मते व प्रश्न विचारात पुढील काम करावे, असा ठराव ग्रामपंचायतीमध्ये घेण्यात आला.

याविषयी ग्रामस्थांच्या वतीने भरत सातांबेकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय रस्ते बांधकाम मंत्री नितीन गडकरी, जिल्हा अधिकारी रायगड यांना निवेदन देण्यात आले आहे. ग्रामस्थांना विचारात न घेता काम सुरु राहिले तर १० जानेवारी २०२५ रोजी तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा भरत सातांबेकर यांनी दिला आहे.

पान १ वरून

## पालकमंत्रीपदासाठी लॉबिंग

निर्णय घेतला. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री शिवसेनेचे भरत गोगावलेच झाले पाहिजेत, अशी आमची स्पष्ट भूमिका आहे. तरंच आमच्या उठावाला खऱ्या अर्थाने न्याय मिळेल, असं महेंद्र थोरवे म्हणाले होते.

रायगड जिल्ह्याच्या राजकारणाचा विचार करता पालकमंत्रीपदासाठी अजित पवार राष्ट्रवादी, शिंदे शिवसेना आणि भारतीय जनता पार्टी हे तीनही पक्ष प्रबळ दावेदार आहेत. यामध्ये राष्ट्रवादीच्या आदिती तटकरे यांनी दोन वेळामंत्रीपद भूषवले आहे. हि एक जमेची बाजू त्यांच्याकडे आहे. त्याचबरोबर शिवसेनेचे भरत गोगावले यांची गत महायुतीच्या काळात मंत्रिपद आणि पालकमंत्रीपद देण्यावरून बोलावं केली होती. यामुळे गोगावले यांना यावेळी कॅबिनेट मंत्रिपद देण्यात आले आहे. यामुळे त्यांनीआणि अन्य शिवसेनेच्या आमदारांनी पालकमंत्रीपद गोगावले यांना मिळावे यासाठी जोरदार लॉबिंग सुरु केली आहे. भारतीय जनता पार्टीचे आमदार प्रशांत ठाकूर यांना खरेतर यावेळी मंत्रिपदाची लॉटरी लागणार अशी चिन्हे होती.परंतु त्यांना मंत्रिपदाची माळ न मिळाल्याने आपसूक त्यांची मंत्रिपदाची आणि पालकमंत्रीपदाची दावेदारी संपुष्टात आली आहे.

## सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा

एक लाख २५ हजार ४११ डॉक्टरांची आवश्यकता आहे.

प्रत्यक्षात मात्र राज्यात मार्च २०२२ पर्यंत एक लाख ७१ हजार २८२ नोंदणीकृत डॉक्टर आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या १:१००० च्या मानकाच्या तुलनेत महाराष्ट्रातील डॉक्टर-लोकसंख्येचे प्रमाण १:७३२ आहे. अशाप्रकारे, राज्यात जागतिक आरोग्य परिषदेच्या निकषांपेक्षा जास्त (३७ टक्क्यांनी अधिक) डॉक्टर आहेत. मात्र परिचारिकांची ५८ टक्के कमतरता असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले.

## पायलट प्रोजेक्टनंतर ई-रिक्षा कायम धावणार

भेटीत गावातील लोकप्रतिनिधी व स्थानिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. रिक्षा संघटनेचे सचिव सुनिल शिंदे यांनी सहा महिन्याचा ई-रिक्षा सेवेची सविस्तर माहिती दिली.

८६८३४ प्रवाशांनी ई-रिक्षा मधून प्रवास केला दररोज २८४ विद्यार्थी व २३ शिक्षक याना ई-रिक्षाची सेवा दिली जाते. १३७ रुग्णांना बी जे हॉस्पिटलमध्ये जाण्यास सेवा दिली आहे. नागेश कदम व रुपेश गायकवाड यांनी उर्वरित ७४ हात रिक्षा चालकांना ई-रिक्षाची परवानगी देण्याची मागणी केली. हात रिक्षाच्या अमानवीय प्रथेतून मुक्ती हाच श्रमिक रिक्षा संघटनेचा उद्देश असल्याचे स्पष्ट केले. माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, प्रदीप घावरे, प्रतिभा घावरे, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष राजेश चौधरी, कुलदीप जाधव यांनी चर्चेत भाग घेतला व ई-रिक्षांची संख्या वाढविण्याची मागणी केली. तसेच ई-रिक्षा सेवा चोवीस तास उपलब्ध केली जावी ही देखील प्रमुख मागणी केली. शिवसेना शाखा प्रमुख चंद्रकांत चौधरी , दत्ता सनगरे, चंद्रकांत जाधव, शैलेंद्र दळवी, प्रकाश सुतार, सुहासिनी दाभेकर, अर्चना बिरामने, प्रीती कळंबे आदी उपस्थित होते.

## बांगलादेशातील घडामोडीचा फटका बंगाली नागरिकांना

बंगाली भाषिक महिलांची टक्केवारी जास्त आहे. त्याच सोबत परिसरात असलेल्या लेडीज बारमध्ये तसेच देह विक्रीचा व्यवसाय करणाऱ्यानमध्ये बंगाली भाषिक महिलांची संख्या मोठी आहे.त्याच बरोबर फेरीवाला व्यवसाय तसेच पदपथावर केल्या जाणाऱ्या व्यवसाया मध्ये बंगाली भाषिक नागरिकांचे प्रमाण मोठे आहे. सध्याच्या घडीला बांगलादेशात अल्पसंख्याक समूहावर बहुसंख्य असलेल्या समुदायाकडून करण्यात येत असलेल्या अत्याचारामुळे भारतातील बंगाली भाषिक नागरिकांना बांगलादेशी म्हणून टार्गेट करण्यात येत असल्याने बंगाली भाषिक नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

**मागील १० वर्षापासून मी नवी मुंबई परिसरात फळ विक्रीचा व्यवसाय करत आहे. मी मुळचा पश्चिम बंगाल राज्यातील असून, हिंदू धर्मीय आहे.मला या पूर्वी व्यवसाय करताना कोणतीही अडचण आली नव्हती. पण बांगलादेशात उद्धवलेल्या परस्थितीमुळे अलीकडच्या काळात मला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.- सुमेध सरकार. फळ विक्रेता**

## बोर्डाचे विद्यार्थी टेन्शन फ्री

या सर्वांना आळा बसावा आणि विद्यार्थी व पालक यांना परीक्षेसह बोर्डाच्या नियमांविषयी योग्य माहिती मिळावी, यासाठी हे ॲप बनविले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी, मार्च २०२५ मध्ये होणाऱ्या बारावी, दहावी परीक्षेचे वेळापत्रक आपल्या संकेतस्थळावर २१ नोव्हेंबरपासून उपलब्ध करून दिले आहे. तसेच चालू शैक्षणिक वर्षाच्या परीक्षेत गणित व विज्ञानाच्या विषयाच्या तीव्रतेच्या निकषात कोणताही बदल नाही.

बोर्डाने विद्यार्थी, पालक, शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांच्या सोयीसाठी हे ॲप बनविले आहे. यात दहावी, बारावी परीक्षेचेच वेळापत्रक, मार्च २०२४ परीक्षेच्या ठराविक विषयांच्या प्रश्नपत्रिका, परिपत्रके उपलब्ध करून दिली आहेत. राज्यातील नऊ विभागीय मंडळांची माहितीही उपलब्ध करून दिली आहे. हे ॲप गुगल प्ले स्टोअरवर या नावाने मोफत उपलब्ध आहे. यात विद्यार्थी, शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांना एका क्लिकवर सर्व माहिती उपलब्ध होणार आहे.

संकेतस्थळावर येत होत्या अडचणीमहाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे संकेतस्थळ आहे. मात्र, त्यावर अनेकदा विद्यार्थ्यांना अडचणी येत होत्या. त्यामुळे ही नवी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या ॲपवर ठराविक विषयाच्या प्रश्नपत्रिकाही उपलब्ध करून दिल्या आहेत. त्याचा विद्यार्थ्यांना लाभ होणार आहे. शाळा, महाविद्यालयांची सोयया ॲपवर शाळा, संस्था व कर्मचाऱ्यांसाठी लॉगिन उपलब्ध करून दिले आहे. यासह नमुना प्रश्नपत्रिका, वेळापत्रक, निकाल, विशेष विद्यार्थी आदी बाबी विद्यार्थ्यांसाठी आहेत. तर शुल्क परतावा, अंतर्गत व प्रात्यक्षिक गुण यासह संबंधित बाबी शाळांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तर परीक्षा काळात विद्यार्थ्यांना लागणारे प्रमाणपत्र, निकालानंतर गुणपत्रक व प्रमाणपत्रांची पडताळणी आदी सुविधाही उपलब्ध आहेत.

## जीएसटी परिषदेची बैठक संपन्न!

अध्यक्षतेखाली या बैठकीत या संबंधाने नियुक्त मंत्रिगटाला कोणताही निर्णय घेण्यासाठी आणखी वेळ हवा असल्याचं सांगण्यात आलं आहे. मंत्रिगटाने १४८ वस्तूंवरील करामध्ये दरबदल करण्याची शिफारस केली आहे. देशात सध्या, जीवन व आरोग्य विम्यावर भरलेल्या हप्त्यावर १८ टक्के दराने जीएसटी आकारला जातो. मंत्रिगटापुढे, यात सूट देण्यासह, ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य विमा व मुदतीच्या जीवन विम्यावरील करात सूट देण्याची तसेच ५ लाख रुपयांच्या आरोग्य विम्याच्य संरक्षणावरील ५ टक्के कर दर कमी करण्याबाबत शिफारस देण्यास सांगण्यात आले होते.

## वडाळ्यात कारने मुलाला चिरडले

ड्रायव्हर म्हणून काम करत असल्याची माहिती आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी भूषणला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आयुष हा त्याच्या आई वडिलांसोबत वडाळ्यातील आंबेडकर कॉलेजजवळील फूटपाथवर राहत होता. त्याचे वडील मजूर आहेत. शनिवारी सायंकाळी आरोपी भूषण संदीप गोळे आंबेडकर कॉलेज जवळील परिसरात यु-टुर्न घेत होता, त्याच वेळी आयुष गाडीच्या चाकाखाली आला. या अपघातात आयुषला गंभीर दुखापत झाली. त्यामुळे त्याला तत्काळ रूग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं. महत्त्वाचे म्हणजे या घटनेनंतर नागरिकांनी आरोपीला पकडण्याचा प्रयत्न केला. त्याला घटनास्थळावरून पळ काढण्यात यश आलं. दरम्यान, याप्रकरणी आयुषच्या आईवडिलांच्या तक्रारीनंतर आता पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल आहे. तसेच त्याचा शोध घेत त्याला अटकही केली आहे. यासंदर्भात बोलताना, पुढील तपास सुरु असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## महागायकाच्या सुरांनी गुंजला पीएनपीचा प्रभाविष्कार

होण्याअगोदर पासूनआहे. अनेक नवे आहेत ज्यांचे मला सहकार्य झाले आहे. यामध्ये पीएमपीच्या कार्यवाह चित्रलेखा नृपाल पाटील यांचे नाव अग्रस्थानी आहे. मी पीएनपी महाविद्यालयाचा सदस्य झालो आहे. आपण मला कलाक्षेत्रांतील सोहळा आयोजित करून निमंत्रित करा मी नेहमी तुमच्या सोबत असेन, असे महाराष्ट्राचा महागायक अभिजीत कोसंबी म्हणाले.

प्रभाविष्कार या सांस्कृतिक सोहळ्यात कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या आजी माजी विद्यार्थ्यांना नवरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले, यामध्ये प्रज्योत पाटील - सामाजिक क्षेत्र, मानसी नागावकर - शैक्षणिक क्षेत्र, श्रुती टोपले - शैक्षणिक क्षेत्र, जयेश पाटील - कला क्षेत्र, सानिया म्हात्रे - कला क्षेत्र, सुयोग आंग्रे- साहित्य क्षेत्र, रितेश शिरोसे- अष्टपैलू, मनोज मेंगाळ - क्रीडा क्षेत्र, करण भगत - क्रीडा क्षेत्र यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

## परप्रांतीयाकडून अल्पवयीन मुलीचा विनयभंग

आई व आजीला मारहाण केली. याघटनेत पीडित मुलीचे वडील, आई व आजी जखमी झाले आहेत. मुलीचे वडील हे मुंबई पोलीस दलात कर्मचारी असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे. मारहाणीची संपूर्ण घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली असून पीडित मुलीच्या आईच्या तक्रारीवरून मानपाडा पोलीस ठाण्यात उत्तम पांडे व त्याची पत्नी रिना पांडे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दोघाना ताब्यात घेतले असून चौकशी सुरू केली आहे. या घटनेनंतर पुन्हा एकदा परप्रांतीयांचा प्रश्न ऐरणीवर आला असून या परप्रांतीयांची मुजोरी वाढत आहे. असा प्रश्नही या निमित्ताने उपस्थित होत आहे. दरम्यान अशा गोष्टीना आळा घातला पाहीजे, अशी मागणी आता होऊ लागली आहे.

# रुग्ण उपयोगी वैद्यकीय साहित्य उपलब्ध



**। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।**
श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन येथील सेवाभावी व्यक्तिमत्त्व डॉ. राजेश पाचारकर यांच्याकडून सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून आपल्या परिसरातील गरीब, गरजू रुग्णांसाठी व्हील चेअर, टॉयलेट खुर्ची आणि कमोड, वॉकर, कुबड्या, नेबुलायझर, चालण्याची काठी, ग्लूकोम ीटर(शुगर मशिन), रक्तदाब मोजण्याची मशिन, गरम पाण्याचा शेक देण्यासाठी पिशवी इ. रुग्णोपयोगी वैद्यकीय साहित्य वापरा आणि परत करा या तत्त्वावर रविवारी (दि.२३) पासून उपलब्ध करण्यात आले आहे.

पंचक्रोशीतील ज्या गरीब गरजू रुग्णांना याची आवश्यकता भासेल त्यांनी या सेवेचा लाभ घ्यावा. त्याचबरोबर रुग्णांनी नेलेल्या उपकरणाचा वापर काळजीपूर्वक करावा जेणेकरून आपला वापर झाल्यावर इतर रुग्णांनासुद्धा त्याचा वापर करता येईल, असे आवाहन डॉ.राजेश पाचारकर यांनी केलं आहे. याप्रसंगी डॉ.राजेश पाचारकर मित्र फाउंडेशनचे सदस्य उपस्थित होते.

# वारे येथे अखंड हरिनाम सोहळ्याचे आयोजन



**। नेरळ । प्रतिनिधी ।**
कर्जत तालुक्यातील वारे गावातील पारंपरिक आणि धार्मिक वारसा असलेला अखंड हरिनाम सप्ताह यावर्षी २१ डिसेंबर ते २८ डिसेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. हनुमान मंदिराच्या परिसरात या नामयज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे.

वारे येथे सलग ३९ वर्षे अखंड सुरू असलेली ही परंपरा वारकरी संप्रदायाच्या सहभागातून अधिक भव्य आणि आध्यात्मिक स्वरूपात पार पडत आहे.या सप्ताहामध्ये नामवंत कीर्तनकार आणि प्रवचनकार विविध अध्यात्मिक विषयांवर कीर्तन प्रवचन करणार आहेत. सप्ताहाचे प्रमुख आकर्षण आहे. सकाळी पारायण दुपारी प्रवचन आणि रात्री आयोजित केले जाणारे हरिनाम कीर्तन, ज्यामध्ये भक्तगण भाविकतेने सहभागी होतात.

या सातही दिवसांत या अखंड हरिनाम सप्ताहामागील मुख्य उद्देश म्हणजे व्यसनमुक्ती आणि धर्मजागृती आहे. सप्ताहामध्ये कळंब परिसरातील वारकरी हे कीर्तन, प्रवचनामध्ये सहभागी होण्यासाठी येत असतात.

## २७ वर्षीय महिला बेपत्ता

**नवीन पनवेल :** २७ वर्षीय कविता जितेंद्र भगत ही महिला राहत्या घरातून कोणाला काही न सांगता पैसे आणि मोबाईल घेऊन निघून गेली. तिचा आजूबाजूच्या परिसरात शोध घेतला, मात्र ती सापडून आली नाही. त्यामुळे ती हरवली असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली. तिचा वर्ण गोरा, बांधा सडपातळ असून उंची पाच फूट, दोन इंच आहे. तिला हिंदी, मराठी भाषा बोलता येते. या महिलेबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस हवालदार संजय दोरगे यांच्याशी संपर्क साधावा.


### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकत तिचे मालक शकील अब्दुरकादिर लोगडे पत्ता : मु.पो. कळंब, ता. कर्जत, जि. रायगड- ४१०१०१ यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे कळंब, ता. कर्जत, जि. रायगड**

| स.नं./हि.नं. | एकूण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे |
|---|---|---|
| १२२/३/ब | खाता क्र. १८०७ मधील लिहून देणार यांचे यांचे मालकीचे एकूण क्षेत्र १-४१-०० हे. आर. पॉ. पैकी विकत देत असलेले क्षेत्र ००-४८-०० हे.आर.पॉ. | १-५३ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, कुळमुखत्यारपत्र, बयाना, ताबा, कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. २३/१२/२०२४

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता- बी-३०१ सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९४०३६४७९५३

# अलिबाग समुद्रकिनारी पर्यटकांची मांदियाळी



● अलिबाग समुद्रकिनारी शनिवार-रविवारची मज्जा लुटण्यासाठी मुबंई, पुणे, नाशिक येथील पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. यावेळी शैक्षणीक सहलीसाठी आलेल्या विद्यार्थ्यांनी देखील पाण्यात मनसोक्त डुबत समुद्रस्नानाची मजा लुटली. (छायाचित्रः समीर मालोदे)

# अखेर पालिका प्रशासन नमले

## कर्जतकरांच्या उपोषणाला तूर्तास स्थगिती

**। कर्जत । प्रतिनिधी ।**
**गेली अनेक दिवस कर्जत नगरपरिषद हद्दीतील नागरिकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. रोज त्याच त्याच समस्यांमुळे कर्जत शहरातील नागरिक हैराण झाले आहेत. अनेक वेळा तक्रारी आणि निवेदन देऊन देखील समस्या सुटत नसल्याने कर्जत शहर बचाव समितीने कर्जत नगरपरिषदेच्या भोंगळ कारभाराविरोधात सोमवार दि.१६ डिसेंबरपासून उपोषणाला सुरुवात केली होती. अखेर शनिवारी (दि.२१) सहाव्या दिवशी कर्जत नगरपरिषदेने विविध नागरी समस्या सोडविण्याबाबतचे आश्वासन आणि लेखी पत्र दिल्याने उपोषणाची सांगता करण्यात आली.**



कर्जत बचाव समितीने पुकारलेल्या आमरण साखळी उपोषणाला नागरिकांचा वाढता पाठिंबा मिळाल्यामुळे कर्जत शहरातील वातावरण चांगलेच तापले होते. दरम्यान, उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी कर्जत नगरपरिषदेचे कर्मचारी, पोलिस अधिकारी आणि परिवहन वाहतूक अधिकारी यांची समितीसोबत चर्चा झाली होती. परंतु, जो पर्यंत नागरी समस्यांबाबत पालिकेकडून ठोस उपाय योजना आणि प्रत्यक्ष कारवाई होत नाही तो पर्यंत उपोषण सुटणार नाही, असे समितीकडून सांगण्यात आले होते. समिती उपोषणावर ठाम राहिल्याने उपोषणाच्या चौथ्या दिवशी उशीरा कर्जत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी वैभव गारवे यांनी भेट देऊन काही समस्यांवर सकारात्मक चर्चा करण्यात केली. तसेच, उपोषणाच्या पाचव्या दिवशी नागरी समस्यांबाबत प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरू झाल्याने समितीने समाधान व्यक्त केले आहे. परंतु, असे असले तरी काही समस्या सोडविण्याबाबत पालिका अधिकाऱ्यांनी मुदत मागितल्याने तूर्तास हे उपोषण स्थगित केल्याचे ॲड. कैलास मोरे यांनी जाहीर केले आहे.


> “ कर्जत नगर परीषद स्थापन झाल्यापासून अनेक तांत्रिक व कायदेशीर बाबींची पूर्तता न करता कारभार सुरु होता. परंतु, आपल्या आंदोलनानिमित्त अनेक बाबी आता नगर परीषद पुर्ण करीत आहे. अनेक गोष्टी सविस्तरपणे नागरीकांना उघडपणे माहीत झाल्या आहेत. त्यामुळे येत्या काळात शहरातील प्रश्न सोडवण्यासाठी खूप सोयीचे जाणार आहे. तसेच, हे यश जनतेचे अर्थात कर्जत शहर बचाव समितीचे असणार आहे.
> – ॲड. कैलास मोरे, कर्जत शहर बचाव समिती प्रमुख ”

### मागण्यांची पूर्तता..

एक्सप्रेस फिडर ६ महिन्यांत कार्यान्वित करणार, पाणी गळतीचे काम ४५ दिवसांत पूर्ण करणार, पाणीपुरवठा वाहिनींतून पाणी चोरी कनेक्शनबाबत शहानिशा करणार, कुत्र्यांचे निर्बीजीकरण करणार, घंटा गाड्यांना तात्काळ घंटा बसविणार, शौचालयांची दुरुस्ती करून घेणार, रस्ता रहदारीतील विद्युत पोल हटविणार, महत्वाच्या ठिकाणी ननवीन सीसीटीव्ही बसविणार, अनधिकृत हातगाड्या हटविणार, तसेच, अधिकृत हातगाड्यांवर नंबर प्लेट लावणे तसेच हातगाड्यांची पर्यायी व्यवस्था करून हातगाड्यांना पिवळ्या पट्ट्याच्या आंतमध्ये लावण्याचे निर्देश देणार, आरोग्य फवारणी संदर्भात आठवड्याचे वेळापत्रक देणार, एकरी वाहतूक चालू करून अनधिकृत रिक्षा स्टँडवर कारवाई करून बॅरिगेट्स कायम स्वरूपी करणार असल्यच्या मागण्या पुर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

## माथेरानमध्ये अवैध धंदे तेजीत

**। माथेरान । वार्ताहर ।**
माथेरानमध्ये मागील काही वर्षांपासून अवैध धंदे तेजीत दिसत आहेत. याबाबत कुणाच्याही तक्रारी येत नसल्याने मटका आणि ऑनलाइन रेसेस खेळण्यासाठी युवा वर्गाची झुंबड पडत आहे. यामध्ये लाखो रुपयांची उलाढाल होत असते. त्यामुळे हे जुगार खेळण्यासाठी अनेकजण कर्जबाजारी झाले आहेत. तर, काही जणांनी सावकारांकडून दहा टक्के व्याजाने पैसे काढून या जुगारात लावले होते. हा कर्जाचा अवाढव्य डोंगर फेडता येत नसल्यामुळे काहीजण गाव सोडून गेले होते. शेवटी त्यांना मित्र मंडळींनी आधार देऊन माघारी आणल्याचे बोलले जात आहे. या प्रकारांमुळे त्यांच्या पालकांमध्ये एकप्रकारे भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. अशा प्रकाराचे अवैध धंदे गावाच्या वस्तीच्या ठिकाणी जोमाने सुरू असल्याचे येथील काही महिलांनी सांगितले आहे. याबत अनेकदा पोलीस कर्मचारी यांना ही बाब निर्दशनास आणून दिली होती. परंतु, हे अवैध धंदे आजही सर्रासपणे सुरू आहेत. रायगड पोलीस अधीक्षकांनी याबाबत लक्ष केंद्रित करावे, अशी मागणी होत आहे.



## नांदगावात रानगव्याचा ग्रामस्थावर हल्ला

**। कोर्लई । वार्ताहर ।**
मुरुड तालुक्यातील नांदगावमध्ये रानगव्याचा शिरकाव झाला असून गावातील एका ग्रामस्थावर हल्ला केल्याची घटना घडली आहे. यामध्ये हा ग्रामस्थ किरकोळ जखमी झाला असल्याची माहिती समोर आली आहे.

मुरुड तालुक्यातील फणसाड अभयारण्यात काही वर्षांपूर्वी रानगवे सोडले होते. आता या रानगव्यांची संख्या वाढत असल्याने त्यांचा तालुक्यामध्ये संचार सुद्धा वाढला आहे. फणसाड अभयारण्य व नांदगाव लागुन असल्याने हे रानगवे गावात शिरतात. दरम्यान, नांदगावच्या समुद्र किनारी पहाटे ग्रामस्थांना गव्याचे दर्शन झाले होते. हा गवा फणसाड अभयारण्यातून आला असून शुक्रवारी (दि.२०) सकाळी तो नांदगाव ग्रामपंचायत हद्दीतील खालचा मोहल्ला परिसरातील गौतम दाबणे यांच्या नारळ सुपारी बागेतून रस्त्यावर आला होता. यावेळी त्या गव्याने एका व्यक्तीला टक्कर मारुन तो नांदगाव समुद्रकिनारी पळून गेला होता. त्यानंतर त्याने समुद्र किनाऱ्यासह नजिकच्या बागांतून जात परत फणसाड अभयारण्याकडे कूच केल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

## द्रोणागिरी महोत्सवाचे उद्घाटन

**उरण :** द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनच्या २४ व्या महोत्सवाचे उद्घाटन नुकतेच बोकडविरा येथील मैदानावर करण्यात आले आहे. या उद्घाटन समारंभाला मा.आ. मनोहर भोईर यांच्यासह पोलादपूरचे नगरसेवक शिवराज पार्टे, पोलादपूर क्रिकेट असो. चे अध्यक्ष निलेश कोळसकर, तान्हाजी मालुसरे यांचे मामा सुभेदार शेलार यांचे वंशज दिपक शेलार, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पायदळचे प्रमुख सरनौबत पिलाजी गोळे यांचे वंशज मनोहर गोळे, सुभेदार ज्योत्याजी केसरकर यांचे वंशज आदेश केसरकर, जेएनपीए बंदराचे माजी विश्‍वस्त एस.सी. मिश्रा, साहित्यिक पुंडलिक म्हात्रे, रायगड जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या वैशाली घरत, ब्रह्मा कुमारी उज्वला आदी मान्यवर उपस्थित होते.

# नागोठण्यात तीव्र निषेध




**। नागोठणे । वार्ताहर ।**
राज्यसभेत गृहमंत्री अमित शाहांचे भाषण झाले. या भाषणात त्यांनी आजकाल आंबेडकर आंबेडकर असं म्हणण्याची फॅशन झाली आहे. विरोधकांनी इतक्या वेळा देवाचे नाव घेतले असते तर त्यांना स्वर्गात जागा मिळाली असती, असे संतापजनक वक्तव्य केले होते. अमित शाह यांच्या याच वक्तव्यासंदर्भात सर्वत्र टीकेची झोड उठलेली असतांनाच नागोठण्यातही याचे पडसाद उमटले होते. नागोठण्यातील नागरिकांनी एकत्र येत येथील छ. शिवाजी महाराज चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल देशाचे गृहमंत्री अमित शाह यांच्या बेजबाबदार व अपमानास्पद वक्तव्याचा निषेध करण्यात आला. तसेच, अमित शाह यांच्या राजीनाम्याची मागणी करीत त्यांच्या विरोधात घोषणाही देण्यात आल्या.

यावेळी एस.एन. गायकवाड, चंद्रकांत गायकवाड, संतोष गायकवाड, चंद्रकांत अडसुळे, प्रकाश कांबळे, रोशन पाटील, बाळू रटाटे, अजित दफेदार, रुपेश जगताप, मनोज जाधव, गणेश कांबळे, स्वप्नील शिर्के, संदीप जाधव, बालम मुजावर, विलास कांबळे, संजय जाधव, मयूर गायकवाड, देवराम कांबळे, विजय शिर्के, प्रकाश जाधव, मच्छिंद्र लेंडी, कमलाकर बांगारे, प्रभाकर ओवाळ, दिलीप दाभाडे, संदीप मोहिते, निलेश शेलार, आकेश गायकवाड, सुरेश कांबळे, कमलाकर ढिकले, विकास जाधव, सविता जाधव, कांचन डिकले, संजय गायकवाड, विकी कदम, सुदिन शिर्के, देवराम कांबळे, जगदीश वाघमारे, आदिनाथ अडसुळे, कुणाल गायकवाड, प्रमोद आरडे, दिलीप गायकवाड, रामदास लोखंडे, अशोक गायकवाड, संतोष अडसुळे, अमित अडसुळे, सुमित शेलार आदी उपस्थित होते.

## पनवेलमध्ये आढळला मृतदेह

**। पनवेल । प्रतिनिधी ।**
पनवेल रेल्वे स्टेशन चौकीजवळील आझाद नगर झोपडपट्टीमधील मुख्य रस्त्यालगत असलेल्या फुटपाथवर एका वृद्ध इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. या वृद्धाच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. या वृद्धाचे अंदाजे वय ६५ वर्षे, डोक्याचे केस पांढरे व टक्कल पडलेले, दाढी मिशी पांढरी व वाढलेली, बांधा सडपातळ, उंची अंदाजे ५ फुट ४ इंच इतकी आहे. तरी या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक सारिका झांझुर्णे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# श्रीवर्धनला वाहतूक कोंडीचे ग्रहण

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**
गेल्या काही वर्षांत श्रीवर्धन शहरासह तालुक्यातील हरिहरेश्‍वर, दिवेआगर इ. ठिकाणी पर्यटकांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यावर झालेले सुशोभीकरण, मोठ्या प्रमाणावर झालेल्या निवास व्यवस्था, हॉटेल्स, पर्यटनाबद्दल दिवसेंदिवस वाढत असलेली आवड इ. कारणांमुळे पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. परंतु, येथील अरूंद रस्त्यांमुळे स्थानिकांसह पर्यटकांना नेहमीच वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.



श्रीवर्धनमधील छ. शिवाजी महाराज चौकात सर्वाधिक वाहतूक कोंडी होत असते. विशेष म्हणजे या ठिकाणी क्वचितच एखादा वाहतूक पोलीस असतो. आणि कधीकधी वाहतूक कोंडीमुळे पर्यटक व स्थानिकांच्यात वादाचे प्रसंगही उद्भवत असतात. या समस्येवर श्रीवर्धन शहरातील रस्ते रुंदीकरण हा एकमेव उपाय असला तरी श्रीवर्धन एसटी बस स्थानकाच्या समोरील बाजूकडून थेट श्रीवर्धन बाजारपेठेपर्यंत येणारा बाह्य वळण रस्ता काढणे हा एक उपाय आहे. तसेच, हा बाह्यवळण रस्ता एक दिशा मार्ग करण्यात यावा. असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे.

## डेविड शाळेचे स्नेहसंमेलन

**श्रीगाव :** अलिबाग तालुक्यातील नांमाकित सी.बी.सी. बोर्डाच्या डेविड शाळेत वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून ॲड. गीता म्हात्रे या उपस्थित होत्या. यावेळी, शाळेच्यावतीन संमेलनाचे उत्तम प्रकारे नियोजन करण्यात आले होते. कार्यक्रमादरम्यान छोट्या, मोठ्या बाल कलाकारांनी सर्व प्रकारचे नृत्य, गाणी व अभिनयातून लक्ष वेधून घेतले होते. यावेळी ॲड. गीता म्हात्रे यांनी शाळेचे कौतुक करत असताना या शाळेतील मुले, वाहतूक करणारे वाहन चालक तसेच पालक यांचे देखील कौतुक केले आहे. तसेच, शाळेच्या शिस्ती सोबत वाहतुकीची शिस्त देखील या शाळेमध्ये पहावयास मिळते. वाहतुक शाखेचे पोलीस कर्मचारी नेहमीच याबाबत स्तुती करत असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

## हॉटेल्स, रिसॉर्ट दहा दिवसांपूर्वीच हाऊसफुल्ल

# नवीन वर्षाच्या स्वागतासाठी जोरदार तयारी

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**
**उरणमध्ये ख्रिसमस, सरत्या वर्षाला अलविदा आणि नववर्षाच्या स्वागताची आतापासूनच तरुणाईची जोरदार तयारी सुरू झाली आहे.त यामुळे तरुणाईने आखलेल्या एन्जॉयमेंटच्या प्लानमुळे परिसरातील सर्वच हॉटेल्स, रिसॉर्ट व फार्म हाऊस दहा दिवसांपूर्वीच बुक झाल्याने हाऊसफुल्ल झाली आहेत.**



नवीन पीढीतील युवा-युवतींना सण किंवा एखादी सुट्टी मिळण्याचा अवकाश, ते मज्जा करण्याचा एकही संधी वाया घालवत नाही. उलट वेळ, काळ मिळेल तेव्हा मज्जा करण्यासाठी सदैव तत्पर असतात. यातच आता बुधवार दि.२५ डिसेंबरपासून ख्रिसमसला सुरुवात होणार आहे. त्यानंतर ३१ डिसेंबरला सरत्या वर्षाला निरोप देण्याचा दिवस आहे. यावेळी सकाळपासून पहाटेपर्यंत डीजेच्या तालावर साजसंगीत, नाच, गाणे, जल्लोष करण्यात तरुणाई व्यग्र राहाणार आहेत. यासाठी तरुणाईने आधीपासूनच मौजमजा करण्याचे बेत आखले आहेत.

मौजमजा करण्यासाठी तरुणाई बरोबरच सर्वांसाठी उरणचा परिसर उपयुक्त ठिकाण आहे. येथील रानसई धरण, वेश्‍वी, विंधणे, आक्का देवीचा डोंगर, इंद्रायणी डोंगर, करंजा परिसर, ऐतिहासिक द्रोणागिरी डोंगर, जेएनपीए परिसर, टाऊनशिप आदी अनेक ठिकाणे तरुणाईची अगदी पसंतीची आहे. त्याचबरोबर पीरवाडी दर्गा तसेच पीरवाडी, माणकेश्‍वर येथील समुद्राचा फेसाळणारा किनारा, रुपेरी वाळू हौशी पर्यटक व तरुणाईला सदैव साद घालीत असते. त्याचबरोबर मोरा-मुंबई घारापुरी दरम्यान शितल चांदण्या आणि समुद्र सफरीचा आनंद घेण्यासाठीही दरवर्षी हौशी पर्यटकांची विशेष रेलचेल असते.

उरणच्या किनाऱ्यावर आणि परिसरात अनेक हॉटेल्स, रिसॉर्ट, फार्म हाऊस आहेत. कुटुंबियांसह मौजमजा करण्यासाठी असलेल्या या ठिकाणी सदानकदा गर्दी असते. विशेषता सीफुड, फ्रेश सीफुड, स्थानिक खाद्य पदार्थ आणि इतर आवडीचे रुचकर खाद्य पदार्थांचा आनंद घेण्यासाठी देखील पर्यटक येत असतात. यामुळे उरणमधील सर्वच ठिकाणे दहा दिवसांपूर्वीच बुक झाल्याने हाऊसफुल्ल झाली असल्याचे व्यावसायिकांकडून सांगितले जात आहे.

## डोंगरी चढाव अपघाताचे क्षेत्र



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**
मुरुड-राजपुरी ग्रामपंचायत हद्दीतील डोंगरी चढाव अपघाताचे क्षेत्र बनत असल्याने या ठिकाणी रस्त्याच्या कडेला कठडे बसविण्यात यावेत, अशी मागणी स्थानिक व प्रवासी वर्गाकडून होते आहे.

मुरुड हे पर्यटन क्षेत्र असुन या ठिकाणी रोज राजपुरी येथील ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी येणारे शेकडो पर्यटक तसेच स्थानिक नागरिक राजपूरी नजिकच्या रस्त्याच्या चढणीवरून ये-जा करत असतात. सध्या ही चढण पर्यटकांना धोकादायक बनत आहे. दरम्यान, पुण्यावरुन चारचाकी वाहन घेऊन आलेले पर्यटक येथील डोंगरी चढाव चढून जात होते. यावेळी अचानक त्यांची गाडी फसली आणि रिव्हर्स येऊन नशीबाने एका दगडावर अडकली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. तरी या पुर्ण चढव्याच्या रस्तावर नव्याने कठडे उभारुन पर्यटकांचे संरक्षण करावे, अशी मागणी ग्रामस्थ तसेच प्रवासी वर्ग करत आहे.

# आटपलेले वाटप

२३ नोव्हेंबरला विधानसभेचे निकाल आले. त्याला महिना लोटला. तेव्हा कुठे राज्य मंत्रिमंडळाचे खातेवाटप जाहीर झाले. मुळात मुख्यमंत्री कोण यावर दहा दिवस घालवण्यात आले. नंतर मंत्र्यांमध्ये कोणाला कटवायचे आणि कोणाला ठेवायचे हे ठरवण्यात आणखी दहा दिवस गेले. नागपूरचे हिवाळी अधिवेशन तसेच पार पडले. अखेर ते संपल्यानंतर खातेवाटप जाहीर झाले. अधिवेशनात कोणत्या खात्याचा कोण मंत्री असणार आहे हे नक्की नसल्याने चर्चांना आणि प्रश्नांना काही अर्थच नव्हता. सरकारला नेमके तेच हवे होते. त्यांना वेळ काढायचा होता आणि गैरसोयीच्या मुद्द्यांची चर्चा टाळायची होती. तसेही, विरोधक अगदीच दुर्बल झाले आहेत. नुकत्याच झालेल्या पराभवातून अजून सावरलेले नाहीत. त्यामुळे नागपूरच्या थंडीत मौजमजा करून आता सत्ताधारी मंडळी मुंबईत येतील. तेथे नवीन वर्षाचा आनंद वगैरे साजरा करूनच हळूहळू कामाला सुरूवात होईल. अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी उशिरा खातेवाटप जाहीर झाले. त्यात बऱ्याच गोष्टी अपेक्षिल्यानुसारच घडल्या आहेत. गमतीने म्हणायचे झाल्यास एक वेळ देवेंद्रांनी मुख्यमंत्रीपद सोडले असते, पण ते गृह खाते सोडणार नाहीत हे नक्की होते. त्यांनी त्याखेरीज सामान्य प्रशासन आणि विधि व न्याय ही खाती आपल्याकडे ठेवली आहेत. मंत्रालयातील सचिवांपासून ते खालपर्यंतच्या सरकारी कर्मचाऱ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी सामान्य प्रशासन उपयोगी ठरते. मुद्दा नगरविकास खात्याचा होता. राज्यात सुमारे पन्नास टक्के नागरीकरण झाले आहे. तिथले विकासाचे आराखडे व पालिकांचा कारभार हा या खात्याच्या अखत्यारीत येतो. त्यामुळे ठिकठिकाणची बिल्डर लॉबी, कंत्राटदार इत्यादींची गाठ याच खात्याच्या मंत्र्याशी असते. साहजिकच हे प्रचंड पैसा व सत्ता निर्माण करणारे खाते आहे. विलासरावांपासून अनेक मुख्यमंत्र्यांनी ते आजवर आपल्यापाशीच ठेवले होते. नव्या रचनेत देवेंद्रांना ते एकनाथ शिंदे यांच्याकडे सोपवावे लागले आहे. उद्धव ठाकरे यांनी आपल्यापाशी कोणतेच खाते ठेवले नव्हते. त्याचा फायदा उठवून शिंदे यांनी ताकद गोळा गेली.

### शिंदे धूर्त ठरले

पुढे काय झाले हे सर्वांना ठाऊक आहे. त्यामुळे शिंदे यांना पुन्हा ते खाते देणे भाग पडणे ही देवेंद्र व भाजपची हार मानावी लागेल. शिंदे यांनी आपण गृह खात्यासाठी आग्रही असल्याच्या पुड्या माध्यमांमध्ये सोडून दिल्या होत्या. नाराजीची बरीच नाटकेही त्यांनी केली. अमित शाह यांच्याशी चर्चा झाल्यानंतर अचानक आजारी पडून ते साताऱ्याला गेले. पुढची चर्चा थांबली. नंतरही शिंदे नाराज अशा बातम्या सतत येत राहिल्या. त्या खऱ्याखोट्या नाराजीच्या जोरावर आणि गृह खात्याचा तथाकथित आग्रह मागे घेण्याच्या बदल्यात त्यांना त्यांचे लाडके नगरविकास खाते मिळाले आहे. इतकेच नव्हे तर गृहनिर्माण आणि सार्वजनिक बांधकाम ही आणखी दोन महत्वाची खातीही त्यांच्याकडे राहणार आहेत. यातील गृहनिर्माण हे पूर्वीच्या सरकारात भाजपकडे होते. मुंबई व इतर शहरांमधील घरबांधणी या खात्याच्या अखत्यारीत आहे. येत्या सहा महिन्यात बहुदा मुंबई, ठाणे, पुणे यासह सर्व पालिकांच्या निवडणुका होतील. तेथील राजकारणाच्या नाड्या आपल्या हातात ठेवण्यासाठी शिंदे यांना प्रचंड सत्ता या तीन खात्यांमुळे मिळणार आहे. तिच्यातून पैसा कसा निर्माण करणे आणि मतदारांना आपल्या कबजात घेणे हे दोन्ही करणे त्यांना शक्य होणार आहे. ही सत्ता शिंदे यांच्या हाती सोपवावी लागणे ही भाजपची मोठी हार आहे. एकट्याच्या जिवावर इतक्या जागा मिळवूनही भाजपला तूर्तास तरी हवे ते करता येणार नाही याची ही चुणूक आहे. अर्थात, सर्व फाईल्स आपल्याकडे येतील अशी व्यवस्था देवेंद्र करू शकतातच. त्यामुळे शिंदे यांना कितीही अधिकार मिळाले तरी त्यांच्यावर अंतिम नियंत्रण देवेंद्रांचे राहण्याची दाट शक्यता आहे. अजितदादांना अर्थ खाते मिळणार हे नक्की होते. पण लाडकी बहीण व इतर योजनांमुळे ते चालवणे सोपे राहणार नाही. हिवाळी अधिवेशनात पुन्हा ३५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या. तिजोरीची स्थिती नाजूक आहे. त्यामुळे दादांच्या हातात बाकी खात्यांचे नियंत्रण राहील. मात्र खुद्द दादांच्या खात्याचे नियंत्रणही अप्रत्यक्षपणे मुख्यमंत्र्यांकडेच राहील असे दिसते.

### तिघांकडेच सूत्रे

शिंदे सेनेकडेचे अबकारी खाते दादांकडे आले आहे ही त्यांची जमेची बाजू म्हणता येईल. इतके सर्व मंत्री असूनही देवेंद्र, शिंदे व दादा यांनी महत्त्वाची खाती आपल्याकडेच ठेवली आहेत. त्यातही देवेंद्रांनी पुन्हा नावडत्या व नाइलाजाने घ्याव्या लागलेल्या स्वपक्षीयांचा 'कार्यक्रम' केला आहे. आशिष शेलार यांना माहिती तंत्रज्ञान, पंकजा मुंडे यांना पर्यावरण, चंद्रकांत पाटील यांना उच्च व तंत्रशिक्षण अशी खाती दिली आहेत. आपल्या कट्टर समर्थकांपैकी बावनकुळे यांना महसूल देऊन त्यांनी गेल्या वेळी त्यांना विधानसभेचे तिकिट न दिल्याची भरपाई केली आहे. पूर्वी महसूल सांभाळणारे राधाकृष्ण विखे यांनाही या निमित्ताने दणका दिला आहे. गिरीश महाजन यांना जलसंपदा मिळाले आहे. गणेश नाईक यांना मंत्रिमंडळात घेणे हाच मुळी एकनाथ शिंदे यांना शह आहे. आता त्यांना वनसारखे महत्त्वाचे खाते देऊन नाईकांना आणखी बळ देण्यात आले आहे. शिंदे गटातील भरत गोगावले यांना बऱ्याच तपश्चर्येनंतर मंत्रिपद मिळाले. पण त्यांना रोजगार हमी वगैरे खाती देऊन बोळवण करण्यात आली आहे. दादा भुसे यांच्याकडचे शेती खाते काढून त्यांना दीपक केसरकरांचे शालेय शिक्षण देण्यात आले आहे. कृषी खाते भुसे यांचे जिल्हाबंधू माणिकराव कोकाटे यांच्याकडे गेले आहे. उदय सामंत यांच्यासारख्या चमकेश मंत्र्यांना पुन्हा एकवार उद्योगसारखे दुय्यम खाते देऊन शिंदे यांनी आपल्या गटात आणखी कोणी डोईजड होऊ नये याची काळजी घेतली आहे. दादा गटाकडे अन्न व नागरी पुरवठा (मुंडे), अन्न औषध प्रशासन (झिरवाळ) अशी खाती आली आहेत. थोडक्यात सर्व सूत्रे तीन मुख्य नेत्यांच्या हातात राहतील अशा रीतीने हे खात्यांचे वाटप आटपलेले आहे. आता तरी सरकारचा कारभार सुरू व्हावा ही अपेक्षा.

**विचार**

# पाच दशकांच्या छळयुगाचा अंत!

***सीरियामधील बंडखोरांनी वायव्येकडील इडलिबमधील तळावरून अचानक मोहीम सुरू केली आणि राष्ट्राध्यक्ष बशर अल-असद यांची जुलमी राजवट संपुष्टात आली. त्यांच्यामुळे सीरियात गृहयुद्ध सुरू झाले, त्यात पाच लाखांहून अधिक लोक मारले गेले आणि सहा लाख लोक विस्थापित होऊन निर्वासित झाले. असद यांनी रशिया आणि इराणच्या मदतीने सत्ता टिकवली. मात्र आता त्यांच्या राजवटीचा निर्णायक पाडाव झाला आहे.***

**प्रा. डॉ. विजयकुमार पोटे**

एका पंधरवड्यापूर्वी, बंडखोरांनी सीरियाच्या वायव्येकडील इडलिबमधील तळावरून अचानक मोहीम सुरू केली, तेव्हा सीरियातील कोणीही बशर-अल-असादच्या पतनाबद्दल विचारही करत नव्हते. वडील हाफेज अल-असद यांच्या निधनानंतर बशर अल-असद २००० मध्ये सत्तेवर आला. हाफेजने २९ वर्षे सीरियावर राज्य केले. त्याचा राज्यकारभारही त्याचा मुलगा असदच्या शासनाप्रमाणे हुकूम शाहीचाच होता. म्हणजेच बशर-अल-असाद यांना दमनकारी राजकारणाचा वारसा लाभला होता. असद आपल्या वडिलापेक्षा वेगळा वागेल, अशी अपेक्षा होती; पण ही आशा फार काळ टिकू शकली नाही. २०११ मध्ये सिरियाच्या राजवटीच्या विरोधात शांततापूर्ण निदर्शने करणाऱ्यांना निर्दयपणे दडपून टाकणारा माणूस म्हणून बशर अल-असद नेहमीच लक्षात राहिला. त्याच्या निर्णयामुळे सीरियामध्ये गृहयुद्ध सुरू झाले, त्यात पाच लाखांहून अधिक लोक मारले गेले आणि सहा लाख लोक विस्थापित होऊन निर्वासित झाले. बशर अल-असद याने रशिया आणि इराणच्या मदतीने विरोधकांना चिरडून आपली सत्ता टिकवली. रशियाने सीरियामध्ये जोरदार हवाई हल्ले केले. इराणने आपले लष्करी सल्लागार सीरिया आणि हिजबुल्लाला पाठवले तर शेजारच्या लेबनॉनमध्ये त्याला पाठिंबा असलेल्या सशस्त्र गटाने आपले प्रशिक्षित सैनिक सीरियामध्ये लढण्यासाठी पाठवले. या वेळी मात्र स्वतःच्या समस्यांमध्ये व्यस्त असल्यामुळे त्यांनी सीरियाला वाऱ्यावर सोडून दिले. या पार्श्वभूमीवर विरोधक 'हयात तहरीर अल-शाम' (एचटीएस) च्या नेतृत्वाखालील बंडखोरांना रोखण्यास सीरियन सैन्य अक्षम होते. म्हणूनच त्यांनी फारशा विरोधाशिवाय राजधानी दमास्कस तसेच देशातील दुसरे सर्वात मोठे शहर अलेप्पो ताब्यात घेतले तर असद यांनी रशियात आश्रय घेतला.

दमास्कस हे असदच्या सत्तेचे केंद्र. आता, सीरियातील असद कुटुंबाची पाच दशकांची राजवट संपुष्टात आल्याने या प्रदेशातील सत्तेचा समतोल बदलू शकेल. सीरियातील घटनेनंतर इराणला मोठा फटका बसत आहे. बशर-अल-असदच्या शासनाखालील सीरिया हा इराण आणि हिजबुल्ला यांच्यातील संबंधाचा एक भाग होता. शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा पुरवण्यासाठी ते अत्यंत महत्त्वाचे होते. इस्रायलबरोबरच्या युद्धानंतर हिजबुल्ला खूपच कमकुवत झाली आहे आणि तिचे भविष्य अनिश्चित आहे. हुथी हा आणखी एक इराणसमर्थित गटदेखील येमेनमध्ये हवाई हल्ल्यांचे लक्ष्य बनला आहे. या गटांशिवाय इराकमध्ये कार्यरत असलेले सशस्त्र गट आणि गाझामधील हमाससारख्या गटांचे गंभीर नुकसान झाले आहे. सीरियातील नवीनतम हल्ला तुर्कस्तानच्या आशीर्वादाशिवाय शक्य झाला नसता, असे काहींना वाटते. असे असले तरी, काही सीरियन बंडखोर गटांना पाठिंबा देणाऱ्या तुर्कस्तानने 'एचटीएस'ला पाठिंबा नाकारला आहे. काही काळापासून, तुर्कस्तानचे अध्यक्ष एर्दोगान हे बशर अल-असद यांच्याशी संघर्षावर मुत्सद्दी तोडगा काढण्यासाठी चर्चेत गुंतण्यासाठी दबाव आणत आहेत. त्यामुळे सीरियन निर्वासितांना परत येण्याची परवानगी मिळेल, असा त्यांचा होरा होता; पण असद यांनी तसे करण्यास नकार दिला. आज किमान तीन दशलक्ष सीरीयन निर्वासित तुर्कस्तानमध्ये आहेत. 'एचटीएसची मुळे 'अल-कैदा'शी जोडलेली आहेत आणि त्यांचा भूतकाळ अतिशय हिंसक आहे; मात्र गेल्या काही वर्षांपासून या गटाला पुन्हा राष्ट्रवादी शक्ती म्हणून प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होत आहे.

त्याच वेळी, सीरियामध्ये नाट्यमय शासनबदलामुळे राजवटीच्या शीर्षस्थानी एक पोकळी निर्माण होऊ शकते. त्यामुळे अराजकता वाढून अधिक हिंसाचार होऊ शकतो. एचटीएसने अध्यक्ष बशर अल-असद याच्या राजवटीचा पाडाव आणि दमास्कस ताब्यात घेण्याची घोषणा केल्यानंतर त्याचा म्होरक्या अबू मुहम्मद अल-जुलानीची ओळख आणि भूमिकेची चर्चा सुरू झाली आहे. जुलानीचे खरे नाव अहमद हुसैन अल-शरा आहे. त्याला 'अबू मुहम्मद अल-गोलानी' म्हणूनही ओळखले जाते. जुलानीने आपल्या कारकिर्दीची सुरुवात इराकमधील 'अल-कैदा'मधून केली होती. त्याने नंतर 'अल-कैदा'चा नेता अयमान अल-जवाहिरी याच्याशी निष्ठेची शपथ घेतली. २०१२ मध्ये, जुलानीने अल-नुसरा फ्रंट नावाची संघटना स्थापन केली आणि असद सरकार उलथून टाकण्याची शपथ घेतली. यानंतर जुलानीच्या नेतृत्वाखाली 'अल-नुसरा फ्रंट'ने संघटनेचे नाव बदलून 'जभत फतह अल-शाम' असे केले. त्यानंतर २०१७ मध्ये ते एचटीएस असे करण्यासाठी इतर कट्टरवादी गटांमध्ये विलीन झाले. 'एचटीएस' आता सीरियातील सर्वात प्रभावशाली बंडखोर गटांपैकी एक आहे आणि त्याच्यावर थेट जुलानीचे नियंत्रण आहे. अबू मोहम्मद अल-जुलानीला २०१३ मध्ये अमेरिकेने 'विशेष नियुक्त जागतिक दहशतवादी' म्हणून घोषित केले होते. यासोबतच जुलानीवर दहा दशलक्ष डॉलर्सचे इनाम ठेवण्यात आले होते. २०१३ मध्ये संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने त्याचा समावेश प्रतिबंधित दहशतवाद्यांच्या यादीत केला होता. असदचे सैन्य युद्धामुळे कमकुवत झाले होते आणि त्यांचे बरेचसे सैनिक लढायला तयार नव्हते. रशिया, इराण आणि हिजबुल्लाह सारखे मित्र या वेळी मदत देऊ शकले नाहीत. कारण ते स्वतःच्या संघर्षात मग्न होते. सीरियामध्ये जुलानीने नव्या युगाची सुरुवात जाहीर केली आहे. या यशामुळे 'एचटीएस'ने सीरियामध्ये आपली पकड मजबूत केली आहे. असाद राजवटीचे पतन हा रशिया आणि इराणसाठी मोठा धक्का मानला जात आहे. आता जुलानीचे पुढचे पाऊल काय असेल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तो आपली शक्ती बळकट करण्यावर भर देतो की आंतरराष्ट्रीय राजकारण आणि सुरक्षेतील नवी आव्हाने मांडतो हे पहायचे आहे. इस्लामिक बंडखोरांच्या ताब्यात गेल्याने सीरियाच्या भविष्याबद्दल जगभरात अनिश्चितता आणि चिंता आहे. सत्तापालटानंतर सीरियामध्ये दहशतीचे वातावरण आहे. सीरियावर ५३ वर्षांहून अधिक काळ अल-असद कुटुंबाची सत्ता आहे. सीरियन लोकांनी सुमारे १४ वर्षांपूर्वी अशीच शांततापूर्ण निदर्शने केली; परंतु त्यांना हिंसाचाराचा सामना करावा लागला. त्याचे रूपांतर रक्तरंजित गृहयुद्धात झाले. अशा स्थितीत आठवडाभरापूर्वीपर्यंत सीरियातील बहुतांश भागांवर ताबा मिळवणाऱ्या अल-असद कुटुंबाचा इतक्या लवकर अंत कसा झाला, असा प्रश्न उपस्थित होत आहे. सीरियन आर्मीने घोषित केले आहे की ते काही प्रांतांमध्ये आणि जवळच्या स्विडामध्ये आपली उपस्थिती मजबूत करत आहे; परंतु हे सर्व व्यर्थ ठरले आहे.

दरम्यान, 'सीरियन ऑब्झर्व्हेटरी फॉर ह्युमन राइट्स'ने दिलेल्या माहितीनुसार सीरियन सैन्याने इस्रायलच्या ताब्यात असलेल्या गोलान हाइट्सजवळील कुनेत्रातील स्थानांवरून माघार घेतली आहे. सीरिया आधीच संघर्ष करत होता. त्याची अर्थव्यवस्था कोलमडत होती. सरकारविरोधी घटक कॅप्टॅगॉन या सायकोॲक्टिव्ह ड्रगच्या अवैध व्यापारातून देशभर पैसे कमवत होते. असद संपूर्ण देशात अत्यंत तिरस्काराचा धनी झाला होता. कारण लोकांचे जगणे कठीण होत होते. यामध्ये सीरियन आर्मीच्या सैनिकांचाही समावेश होता. ते सरकारच्या या वृत्तीवर खूश नव्हते. बहुतेक सैनिकांना अल-असदसाठी लढायचे नव्हते. बंडखोर पुढे येण्याआधीच सैनिक आणि पोलिस अधिकारी आपली पोस्ट सोडून, शस्त्रे समर्पण करुन पळून जात होते. अल-असदची राजवट कमकुवत होती. ती रशिया आणि इराणच्या लष्करी मदतीवर अवलंबून होती; परंतु रशिया युक्रेनविरोधातील युद्धात आणि इराण इस्त्रायलविरोधातील युद्धात गुंतला होता. त्यामुळेच खचलेल्या सीरियन सैन्याच्या मदतीसाठी ते पुढे येऊ शकले नाहीत. अल-असदच्या जाण्याच्या घोषणेनंतर दमास्कस, होम्स आणि इतर सीरियन शहरांमध्ये उत्सव साजरा करण्यात आला. क्रांतीचा झेंडा फडकवणाऱ्या गर्दीत लोक आनंदाने टाक्यांवर चढले. काही ठिकाणी लोकांनी अल-असदचे वडील हाफेज यांचे पुतळे पाडले. मशिदींमध्ये जमाव एकत्र प्रार्थना करण्यासाठी आणि सार्वजनिक चौकांमध्ये उत्सव साजरा करण्यासाठी जमले. असदविरोधी घोषणा देत आणि कारचे हॉर्न वाजवत लोकांनी आनंदोत्सव साजरा केला. आता सीरिया बदलाच्या एका नव्या टप्प्यावर येऊन पोहोचला आहे.

**आजकाल**

# सोयाबीन, कापूस, बटाटा आणि वाटाणा

**सोमिनाथ घोळवे**



शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या पांढऱ्या आणि पिवळ्या अशी दोन्ही सोन्याची अवहेलना चालू आहे. काल तर हिंगोलीत शेतकऱ्यांनी बाजार भाव कमी असल्याने दोन्ही सोन्याचा जाळून निषेध केला. एकंदर सोनं पिकवून गुन्हा केला आहे का? वाटू लागले आहे.

मुळात सोयाबीन आणि कापूस ही पिके शेतकऱ्यांनी स्वतः हून लागवड करायला सुरुवात केली नाही. तर ही पिके घेण्यासाठी कृषी धोरणे आणि राजकीय नेतृत्वाची हितसंबंधांची भूमिका या कारणांनी लागवड करणे भाग पाडले आहे हे समजून घ्यावे लागेल. शिवाय ही दोन्ही पिके राजकीय बनवले आहेत. मात्र या पिकांचा लाभ शेतकऱ्यांना मिळू दिला नाही हे वास्तव आहे. दुसरे, या पिकांचे ग्रामीण भागात प्रकिया उद्योग देखील सुरू करू दिले नाहीत. भांडवली आणि प्रकिया उद्योगाची मोनोपोली तयार करून नेतृत्व व्यापारी आणि भांडवलदार यांच्याकडे दिली आहे. उद्योगाचे विकेंद्रीकरण आणि सर्वसमावेशक वाटचाल राहू दिली नाही.

हंगामाच्या सुरुवातीला सप्टेंबर - ऑक्टोंबर महिन्यात जो भाव होता, तो देखील आता राहिलेला नाही. निवडणुका झाल्यावर भाव मिळेल असे वाटत होते, पण सत्तेच्या पुढे शेतकरी कोठे दिसतो. सोयाबीन काढून दीड महिना होऊन गेला आहे. तरीही घरात सोयाबीन आहे, त्याचं काय करायचं असा प्रश्न शेतकऱ्यांच्या समोर आहे. सोयाबीन केंद्रावर सोयाबीन विकायला गेलं तर केंद्र संचालक सोयाबीन गाळून, फूट काढणे, बारीक सोयाबीन बाजूला काढून घरी नेण्यास सांगतात. त्यामुळे हमीभाव हा एक जुमला झाला आहे. खरेदी केलं तरी त्याची प्रकिया खूपच गुंतागुंतीची केली आहे.

कापसाला ७५२१ रुपये हमीभाव तर सोयाबीन ला ४८९२ रुपये आहे. सद्यस्थितीत कापसाला ५५०० ते ६५०० /- रू. या दरम्यान भाव मिळतो तर सोयाबीन ला ४०००/- रू. प्रती क्विंटल च्या पुढं जाईला नाव घेईना. हा भाव उत्पादन खर्चापेक्षा कमी आहे. त्यामुळे परतावा मिळत नाही. आगदी शेतकरी मेटकुटीला आले आहेत. एकंदर भाव मिळणार नाही की उत्पादन घेणे थांबवणार नाहीत अशा दुहेरी कोंडीत शेतकऱ्यांना पकडले आहे.

कापूस आणि सोयाबीन हे दोन्ही पिके राजकीय आहेत. या दोन्हीवर राजकारण उभ राहू शकते. पण तसा निवडणूकीत मुद्दा जाणीवपूर्वक पुढे येऊ दिला नाही. ही दोन्ही पिके कोरडवाहू परिसरातील आहेत, अर्थात या पिकांवर कोरडवाहू शेतकऱ्यांची उपजीविका आहे. त्यामुळे अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणजे या दोन्ही सोन्याचा बाजारभाव. पण तोच भाव वाढताना दिसून येत नाही. त्यामुळे सोयाबीन आणि कापूस या शेतमालाचे काय करायचे हा पेचप्रसंग शेतकऱ्यांच्या समोर तयार झाला आहे.

शहरी ग्राहकांसाठी गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात बटाटा २० रुपये किलो, तर वाटाणा १०० रुपयांना २ किलो मिळत होता. त्या तुलनेत चालू वर्षी डिसेंबर महिन्यात बटाटा ३० रुपयांच्या खाली आला नाही. तर वाटाणा १०० रुपयांना सव्वा किलो वरच थांबलेला आहे. इतरही भाज्यांचे भाव गेल्या वर्षी ज्याप्रकारे होते, त्या पातळीवर आले नाहीत. थोडेसे महागडे आहेत. नेमके काय कारण असेल?.

१. बटाटा आणि वाटाणा यांची लागवड कमी झाली का?.

२. महागाई वाढली असेल?.

३. एकंदर सर्वच प्रकारचा भाजीपाला लागवड कमी झाला आहे का?. मात्र पाऊस सरासरी पडलेला आहे, त्यामुळे तसे काही दिसून येत नाही.

३. या पेक्षा वेगळे काही असेल ?. असे प्रश्न पुढे येतात.

भाजीपाला लागवड क्षेत्र कमी झाले असे म्हणावे, तर भाज्या उपलब्ध आहेत. तुटवडा नाही. मात्र हे वाढीव भाव आहेत, फक्त वाढीव पैसे शेतकऱ्यांनी मिळत नाहीत. पूर्वीप्रमाणेच नाममात्र मिळतात. तरीही चार मिळतील या आशेने पुन्हा पुन्हा लागवड करताना दिसून येतो. दुसरे, पाण्याच्या उपलब्धता किती आहे, यानुसार कोणती भाजी लागवड करायची हे ठरवावे लागते. तिसरे, पाणी जास्त आहे म्हणून कोणतीही भाजीपाला लावता येत नाही. त्यासाठी लागणारी गुंतवणुकीचा आवाक्यात राहील हीच भाजीपाला लावावी लागते. जेणेकरून बाजार भाव घासरला, रोगराई आली किंवा पाणी टंचाई निर्माण झाली तरीही जास्त नुकसान होणार नाही ही काळजी घ्यावी लागते. पण अलीकडे हळूहळू गुंतवणूक वाढत आहे, पण परतावा हा कमी होऊ लागला आहे. त्यामुळे भाजीपाला पीक शेतकऱ्यांना नुकसान देणारे ठरू लागले आहे. प्रश्न असा निर्माण झाला आहे की, असं कोणता भाजीपाला आहे की जो शेतकऱ्यांना नफ्याचा परतावा देईल?. तर अपवाद वगळता एकही दिसून येत नाही. केवळ शहरी ग्राहकांना महागाई वाढलेली दिसून येते. मात्र वाढीव पैसे व्यापारी वर्गाकडे जातात हे मात्र निश्चित.

**साभार**

**लोकसंसद**

## बेस्टच्या भोंगळ कारभाराने प्रवाशी त्रस्त

बेस्ट ही मुंबईकरांची जीवनवाहिनी समजली जाते. दररोज लाखो मुंबईकर बेस्टने प्रवास करतात मात्र हीच बेस्ट आता मुंबईकरांच्या जीवावर उठली आहे की काय अशी शंका येते कारण सध्याच्या घडीला बेस्टच्या अपघाताचे प्रमाण वाढलेले दिसत आहे. दररोज कोठे ना कोठे बेस्ट बसचा अपघात झाल्याची बातमी वाचायला मिळते. मागील आठवड्यातच भरधाव धावणाऱ्या बेस्ट बसने धडक दिल्याने कुर्ला येथे मोठा अपघात झाला या अपघातात सात निष्पाप मुंबईकरांना जीव गमवावा लागला. या अपघातास बेस्ट प्रशासनच जबाबदार आहे. सध्या बेस्टचा सर्व कारभार कंत्राटी पद्धतीने चालू आहे. कुर्ला येथे झालेल्या अपघातातील बस चालक संजय मोरे हा देखील कंत्राटी पद्धतीनेच बेस्ट मध्ये चालक म्हणून काम करीत होता. कंत्राटी पद्धतीने काम करणारा कर्मचारी जबाबदारीने काम करेलच याची शाश्वती नाही. सरकार बेस्टचे खाजगीकरण करत आहे. खाजगीकरणामुळेच बेस्टची वाताहत झाली आहे. बेस्टकडे पुरेशा बस उपलब्ध नाहीत ज्या बस आहेत त्या धडाच्या नाहीत त्यामुळे बस ब्रेकडाऊन होण्याचे प्रमाण वाढले आहे.

**- श्याम ठाणेदार, पुणे**

## जगातील अव्वल पर्यटन स्थळ बनण्याची भारताची क्षमता

स्वित्झर्लंडमधील कॉलोनी शहरात कार्यरत असलेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम या अशासकीय संस्थेने अलीकडेच जाहीर केलेल्या जगातील ११९ देशांच्या 'प्रवास आणि पर्यटन विकास निर्देशांकां'च्या (टीटीडीआय) २०२४ क्रमवारीनुसार भारत पर्यटन उद्योग असणाऱ्या ११९ देशाच्या क्रमवारीत ३९ व्या क्रमांकावर पोहोचला असल्याची माहिती नुकतीच केंद्रीय पर्यटन आणि सांस्कृतिक मंत्रालयाने संसदेत सादर केली. या आधी २०२१ मधील निर्देशांकानुसार भारत पर्यटनदृष्ट्या विकसित देशात ५४ व्या क्रमांकावर होता. 'स्वदेश दर्शन' आणि 'प्रसाद' (तीर्थक्षेत्र पुनरुज्जीवन आणि अध्यात्मिक वारसा संवर्धन उपक्रम) या सारख्या सरकारी उपक्रमांमुळे पर्यटनाच्या पायाभूत सुविधांना चालना मिळाली असून त्यामुळे भारतातील सर्व प्रकारच्या पर्यटन स्थळांकडे अधिकाधिक देशी, परदेशी पर्यटक आकर्षित होत आहेत. खरे तर भारताची पर्यटन क्षमता प्रचंड असून भारतात हिमालयातील बर्फाच्छादित प्रदेश, घनदाट जंगलांनी वेढलेली ठिकाणे, ऐतिहासिक आणि धार्मिक महत्वाची ठिकाणे, निसर्गानी नटलेले विस्तीर्ण समुद्र किनारे, थरचे, कच्छचे वाळवंट, थंड हवेची ठिकाणे अशी पृथ्वीतलावरील निसर्गाची सर्वच वैशिष्ट्ये सामावली असल्यामुळे नजीकच्या काळात भारत पर्यटन क्षेत्रात मोठी झेप घेईल अशी अपेक्षा आहे.

**-प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२३ डिसेंबर**

**१९१३ :-** ब्रम्हचैतन्य गोंदवलकर महाराज समाधीस्त. त्यांची बोधवचने त्यांच्या शिष्यांनी संग्रहित केली. १९५३ : - इतिहास संशोधक विष्णु सीताराम चितळे यांचे निधन. 'ब्रिटिशांचा इतिहास', 'हिंदुस्थानचा अभिनव इतिहास', 'नवभारताचा सांस्कृतिक इतिहास' या पुस्तकांसह पेठे दप्तर भाग १, २ या संग्रहाचे संपादन त्यांनी केले. **१९५४ :-** लेखक, कवी, पत्रकार नरेंद्र बोडके यांचा जन्म. 'पंखपेल', 'सर्पसत्र', 'शुकशकून' हे काव्यसंग्रह, 'सुमनस' हा समीक्षात्मक लेखांचा संग्रह प्रकाशित. **१९६७ :-** लेखक, कवी शाहूराव दगडोबा उजगरे यांचे निधन. दोन खंड काव्यांबरोबर त्यांनी 'अनुभवामृत', 'अभंगमणिमाला', 'काळे ख्रिस्ती', 'चोरटी रास' अशी पुस्तके लिहिली. **१९९६ :-** कवी वसंत लाडोबा सावंत यांचे निधन. कोकणातल्या निसर्गातले विविध गंध त्यांच्या कवितेतून प्रकट होतात. याची प्रचिती 'उगवाई', 'देवराई', 'माझ्या दारातले सोनचाफ्याचे झाड' या काव्यसंग्रहातून होते. **१९९६ :-** सूचीकार, नाटककार, संपादक शंकर नारायण वर्दे यांचे निधन. 'संगीत अढळपद', 'संगीत शारदामंदिर' ह्या नाटकांशिवाय 'मराठी नियतकालिकांची सूची-खंड १, २, ३' हे त्यांचे महत्त्वपूर्ण कार्य. **१९९८ :-** कथाकार, विज्ञानलेखक, कवी सुरेश रघुनाथ मधुरे यांचे निधन. 'चंद्रकांत राजाची कन्या' हा ललित लेखसंग्रह तसेच 'विज्ञानाचे वाटाडे' ही विज्ञानविषयके पुस्तके आणि 'चक्रवणारी कोडी', 'गाणारे पत्रे' ही लहान मुलांसाठी पुस्तके आणि काही कविता त्यांच्या नावावर आहेत. 'युकॉलिप्टस' या काव्यसंग्रहातून यंत्र आणि महानगरांचा मानवी जीवनावर पडणारा प्रभाव तर 'टेट्रॉपॉडस', 'स्काय लाइन', 'ट्रॅफिक आयलंड', 'प्लायओव्हर' ही त्यांच्या कवितेची शीर्षके त्यांच्या अनुभूतींचे वेगळेपण स्पष्ट करतात. याशिवाय 'कॅक्टस व्हिला', 'विश्वकर्म्याचे विश्व' हे त्यांचे गाजलेले कथासंग्रह. 'गाणारे पत्ते', 'अलजबार' ही लहान मुलांची पुस्तके, अशी साहित्य संपदा. **२०१० :-** ज्येष्ठ कला व नाटय समीक्षक ज्ञानेश्वर नाडकर्णी यांचे निधन. कला व नाट्य क्षेत्रातील आस्वादपर समीक्षक म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. अलिकडेच त्यांना फ्रेंच सरकारतर्फे 'अक्षरांचे शिलेदार' हा किताब बहाल करण्यात आला होता. नाडकर्णी यांनी समीक्षक या नात्याने नियतकालिकात जसे विपुल लिखाण केले. तसेच साहित्याच्या विविध प्रकारांतही त्यांच्या पुस्तकांनी आगळे स्थान मिळवले. 'पाऊस', 'भरती', 'चिद्घोष', 'प्रस्थान' हे कथासंग्रह, 'दोन बहिणी', 'कोंडी', 'नजरबंदी', 'वलयांकित' या कादंबऱ्या आदी बरोबरच विख्यात चित्रकार एम. एफ. हुसेन यांच्या वरील 'अनवाणी' तसेच पिकासो, गायतोंडे, डी. डी. दलाल व हिचकॉक यांच्यावरील चरित्रग्रंथांचे लेखनही त्यांनी केले. 'अश्वत्थाची सळसळ', 'अभिनय', 'प्रतिभेच्या पाऊलवाटा', 'प्रोगेसिव्ह आर्टिस्ट्स ग्रुप' आदी समीक्षा ग्रंथांची त्यांनी निर्मिती केली. 'विलायती वारी' हे प्रवासवर्णनात्मक पुस्तक त्यांनी लिहिले. बालगंधर्वावरील इंग्रजी चरित्राचे लेखन करुन त्यांनी मराठीतील या बुजुर्ग कलावंताची जागतिक पटावर ओळख करुन दिली.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२३ डिसेंबर

१) श्री.नीलकंठ गोविंद पाटील
चेंढरे-अलिबाग
२३-१२-१९३५

२) श्री. यशवंत लक्ष्मण पाटील
चाळमळा, पो. थळ,
२३-१२-१९५०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

# अतिक्रमण पथकावर भ्याड हल्ला

## महिला पोलीस अधिकाऱ्याचे डोके फोडले




**। पालघर । प्रतिनिधी ।**

**बेकायदा बांधकामांवर कारवाईसाठी गेलेल्या अतिक्रमण पथकावर हल्ला केल्याची घटना मीरा रोडच्या शांती पार्कमध्ये घडली आहे. यावेळी जमावाला शांत करण्याचा प्रयत्न करणाऱ्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक मेघना बुरांडे यांच्या डोक्यातदेखील काठी मारल्याने त्याच्या डोक्याला जबर मार बसला आहे. इतकेच नाही तर काही पोलिसांना हल्लेखोरांनी नखांनी ओरबडले आहे.**

मीरा रोड पूर्वेला शांती पार्क भागात एका इमारतीच्या मनोरंजन मैदानाच्या जागेवर श्री गोवर्धन नाथजी हवेली व जय श्री बाल गोपाळ मंडळाने बेकायदा बांधकाम केले होते. यावर कारवाई करण्यासाठी पालिकेचे पथक गेले होते. यावेळी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मात्र, बांधकाम तोडत असताना राकेश कोटीयन यांच्यासह १० ते १५ जणांनी कारवाईला विरोध करत घोषणाबाजी केली. जेसीबी अडविण्यात आल्याने पोलिसांनी त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी राकेश कोटीयन याला बाजूला करत असताना त्याने पोलिसांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर वसन विरडिया या महिलेने थेट वरिष्ठ पोलीस निरीक्षक मेघना बुरांडे यांच्या डोक्यात काठीने हल्ला केला. यात बुरांडे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे.

जमावामधील भावना बगालिया, सुनीता विरडिया, जयश्री सवानी यांनी महिला पोलीस अंमलदार लालन खोजे यांच्या हातांवर नखांनी ओरबाडे केले. याप्रकरणी आरोपी राकेश कोटीयन, वसन विरडिया, भावना बगालिया, सुनीता विरडिया, जयश्री सवानी आदींविरोधात मीरा रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# उड्डाणपूल रद्द करण्यासाठी ग्रामस्थ आक्रमक



**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावरील निवळी येथील उड्डाणपूल रद्द व्हावा यासाठी निवळीचे ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. शनिवारी (दि.२३) त्यांनी एकत्र येत रस्त्यावर उतरून प्रस्तावित उड्डाणपुलाचा प्रस्ताव बांधकाम विभागाने रद्द करावा, अशी मागणी केली आहे. या मागणीसाठी निवळी आणि हातखंबा येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले होते.

रत्नागिरी तालुक्यातील नाणीज येथून जाणाऱ्या मिऱ्या-नागपूर महामार्गावर आजूबाजूच्या गावाच्या सुरक्षिततेसाठी अंडर पास व्हावा आणि मुंबई-गोवा महामार्गावर निवळी बाजारपेठेत होणाऱ्या उड्डाणपूलाऐवजी सरळ महामार्ग व्हावा, अशी येथील स्थानिक ग्रामस्थ, व्यापारी आणि छोट्या व्यवसायिकांची मागणी आहे. मिऱ्या-नागपूर महामार्गावर काही महिन्यांपूर्वी एक दुर्दैवी अपघात होऊन दोघेजण मृत्युमुखी पडले होते. तसेच, सातत्याने या भागात अपघात होत आहेत. या महामार्गाच्या दोन्ही बाजूला लहानमोठी गावे आहेत. त्यामुळे ग्रामस्थांच्या सुरक्षिततेसाठी येथे महामार्गावर अंडर पास करावा, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

मधल्या काळात विधानसभा निवडणुका असल्याने हे काम थांबले होते. मात्र, निवळीवासीय शनिवारी पुन्हा आक्रमक झाले असून दुपारी सर्वजण रस्त्यावर उतरले होते. यावेळी बांधकाम विभागाचे अधिकारीही उपस्थित होते. यावेळी व्यापारी संघटनेचे अध्यक्ष संतोष पाध्ये, संतोष डांगे, बंड्या कोकजे, सुरेश निवळकर, श्रीपद गावडे, सागवेकर, विश्राम तारवे, स्वस्तिक मालप, किरण म ालप, ओमकार मालप, विठ्ठल मालप, सोहम कोकजे, पिंट्या मोहिरे, ऋषिकेश मुळे, विलास आंबेकर, श्रेयस रावणांग आदींसह ग्रामस्थ व व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महायुतीत पालकमंत्रीपदावरुन रस्सीखेच सुरु



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

विधानसभा निवडणुकीत प्रचंड बहूमत मिळूनही महायुती सरकारचा मुख्यमंत्री ठरण्यास खूप वेळ गेला. यानंतर तब्बल २३ दिवसांनी मंत्रिमंडळ विस्तार झाला आणि आता बिनखात्याच्या मंत्र्यांना ८ दिवसांनी खाते देण्यात आले आहे. या खातेवाटपात शिंदेंच्या हाती निराशाच लागली आहे. गृह खाते मिळावे म्हणून शिंदे अडून बसले होते. मात्र, अखेर हे खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्याकडेच कायम ठेवले आहे. तर, अर्थ खाते पुन्हा अजित पवार यांना मिळाले असून गृह आणि अर्थ खात्याच्या तुलनेत कमी वजनदार असलेले तिसऱ्या नंबरचे नगरविकास, गृहनिर्माण खाते शिंदेंकडे कायम आहे. यातच आता महायुतीत पालकमंत्रीपदावरुन रस्सीखेच सुरु असल्याच्या बातम्या समोर येत आहेत.

शनिवारी खातेवाटप जाहीर झाल्यानंतर छत्रपती संभाजीनगरचा पालकमंत्री मीच असणार, असा दावा शिंदे गटाचे मंत्री संजय शिरसाट यांनी केला आहे. तर, रायगडच्या पालकमंत्रीपदावरूनही वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. येथे पालकमंत्रीपद मिळवण्यासाठी शिंदे गट आणि अजित पवार गटात स्पर्धा असल्याचे चित्र आहे. अजित पवार गटाच्या मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे याआधी येथील पालकमंत्रीपद होते. मात्र, आता शिंदे गटाचे मंत्री भरत गोगावले हेही रायगडच्या पालकमंत्रीपदासाठी आग्रही असल्याचे बोलले जात आहे.

यातच बीडच्या पालकमंत्रीपदावरून महायुतीत रस्सीखेच पाहायला मिळू शकते. येथून भाजप मंत्री पंकजा मुंडे आणि अजित पवार गटाचे मंत्री धनंजय मुंडे पालकमंत्रीपदासाठी आग्रही असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, महायुती पालकमंत्रीपदे लवकरच जाहीर करणार की, यालाही दिरंगाई होणार, हे पाहावे लागणार आहे.

## ‘भाजपच्या गुंडगिरीला चोख उत्तर देऊ’

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केला असून त्यांच्या पक्षाचे कार्यकर्ते दादागिरी करीत आहेत. मात्र, भाजपच्या गुंडगिरीला संविधानाच्या मार्गाने चोख उत्तर देऊ, असा इशारा काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी दिला आहे. दरम्यान, काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी शनिवारी (दि.२१) मुंबईत दाखल होत मुंबई कार्यालयाची पाहणी केली व कार्यालयातील कर्मचारी व पदाधिकाऱ्यांकडून हल्ल्याची माहिती घेतली. त्यानंतर दक्षिण मुंबई जिल्हा कार्याध्यक्ष मंदार पवार व इतर जखमी झालेल्या कार्यकर्त्यांची जी.टी. रुग्णालयात जाऊन विचारपूस केली. यावळी त्या म्हणाल्या होत्या.

## गणवेशातही दिपक केसरकरांनी मलई खाल्ली

### आदित्य ठाकरे यांची कारवाईची मागणी

**। नागपुर । प्रतिनिधी ।**

महायुती सरकारने ‘एक राज्य एक गणवेश’ ही योजना सुरू केली होती. मात्र, आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने ही योजना गुंडाळली आहे. या योजनेतील गणवेश वाटपात होणारा विलंब, गणवेशाचा दर्जा, मोजमाप यामध्ये ताळमेळ नाही. योजनेत अनियमितता आणि भ्रष्टाचार झाल्याच्या अनेक तक्रारी आल्या आहेत. त्यावरुन शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे आ. आदित्य ठाकरे यांनी महायुती सरकार आणि माजी शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्यावर घणाघाती टीका केली आहे. आदित्य ठाकरे म्हणाले की, महायुती सरकारने या योजनेतंर्गत राज्यातील बचतगटांना गणवेश तयार करण्याचे काम दिले होते. मात्र, या गणवेशांचा निकृष्ट दर्जा आणि कमी-जास्त मोजमाप यामुळे प्रचंड वाद निर्माण झाला होता. त्यामुळे आता फडणवीस सरकारने ही योजना गुंडाळली आहे. तसेच, एक राज्य एक गणवेश योजनेत अनियमितता असल्याच्या तक्रारी देखील दाखल झाल्या होत्या. राज्य सरकारने आता ती योजना बंद केली आहे. या खात्याचे संबंधित मंत्री केसरकर यांनी त्यात मलई खाल्ली आहे. त्यांच्यावर कारवाई व्हायला हवी. त्यांना मंत्रीमंडळातून दूर ठेवले म्हणजे ते स्वच्छ झाले, असे होत नाही. या योजनते अनियमितता कशामुळे, यात नेमका किती भ्रष्टाचार झाला आहे, याची माहिती जनतेला मिळायलाच हवी, असेही आदित्य ठाकरे म्हणाले.

# परभणी, बीड जिल्ह्यातील घटना दुर्दैवी

## सरकारने लक्ष देणे गरजेचेः शरद पवार

**। परभणी । प्रतिनिधी ।**

परभणी व बीड जिल्ह्यातील दुर्दैवी घटनांनी संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडले आहे. या घटनांबद्दल तातडीने कारवाई होणे गरजेचे असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते खासदार शरद पवार यांनी शनिवारी (दि..२१) परभणीत आयोजित पत्रकार परिषदेत व्यक्त केले आहे.



यावेळी शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना परभणी दौऱ्यापूर्वी या संदर्भात कठोर पावले उचलण्याचा सल्ला दिला आहे. तसेच ते पुढे म्हणाले की, या दोन्ही घटना अत्यंत दुर्दैवी आहेत. अशा घटनांमुळे महाराष्ट्राची प्रतिमा मलिन होते. या घटनांवर राज्य सरकारला वस्तूस्थितीची जाणीव करून देणे आवश्यक आहे, आणि त्यासाठी आम्ही चर्चा करू. या घटनांमुळे महाराष्ट्रात अस्वस्थता पसरली असून या संदर्भात गंभीर विचारमंथन व तातडीने उपाययोजना करने आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. तसेच, शरद पवार यांनी या घटनांबद्दल राज्य सरकारने तातडीने लक्ष घालावे व संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

या पत्रकार परिषदेला खासदार निलेश लंके, फौजिया खान, माजी आमदार अॅड. विजय गव्हाणे, तहेसीन अहेमद खान, माजी आमदार सुरेश वरपुडकर, सुरेश देशमुख, विजय भांबळे, बाबाजानी दुर्राणी, भगवानराव वाघमारे, नदीम इनामदार, बाळासाहेब देशमुख, प्रा.किरण सोनटक्के, डॉ. अनिल कांबळे, रमाकांत कुलकर्णी, बाबुराव घाटुळ यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# वेतन कराराची अंमलबजावणी होणार



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारतातील बंदर व गोदी कामगारांचा वेतन करार २७ सप्टेंबर रोजी झाला असून, या वेतन कराराची अंमलबजावणी जानेवारी २०२५ पासून होणार आहे. असे ज्येष्ठ कामगार नेते अॅड. एस.के. शेट्ये यांनी सांगितले आहे.

मुंबई पोर्ट प्राधिकरणाच्या गोदी विभागातील आउटडोअर डॉक स्टाफच्यावतीने शुक्रवारी (दि.२०)इंदिरा गोदीतील हमालेज बिल्डिंगमधील स्टाफ ऑफिस कार्यालयात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

यावेळी शेट्ये यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, गोदी कामगारांनी निदर्शनासारखी अनेक आंदोलने करून संपाची धमकी दिल्यानंतर गोदी त्यांच्या एकजुटीमुळे १ जानेवारी २०२२ पासून लागू होणारा वेतन करार संपन्न झाला. आता गोदीमध्ये कायम कामगारांची संख्या कमी झाली असून, कंत्राटी कामगारांची संख्या वाढत चाललेली आहे. त्यामुळे आता कंत्राटी कामगारांना संघटित करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी प्रदीप नलावडे, ज्ञानेश्वर वाडेकर, दत्ता खेसे, मारुती विश्वासराव, बबन मेटे, प्रबंधक स्वामी, मिलिंद घनकुटकर, विजय सोमा सावंत यांसह विजय रणदिवे, मनीष पाटील, आप्पा भोसले, बापू घाडीगावकर, प्रदीप गोलतकर, पसंदीप घागरे व विविध संस्थांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# मिनीबसच्या रेडिएटरचा पाईप फुटला

## २५ प्रवासी भाजले

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

असगोलीहून प्रवाशांना घेऊन येणाऱ्या मिडीबसच्या रेडिएटरचा पाईप फुटून रेडिएटरमधील उकळते, हिरवे पाणी पाईपमधून वेगाने बाहेर पडले. हे गरम पाणी गाडीतून उतरणारे प्रवासी आणि गाडीतील अन्य प्रवाशांच्या अंगावर उडाल्याने यात २५ जण भाजले आहेत. या गोंधळातच एक महिला गाडीतून उतरताना पडून जखमी झाली आहे. यातील दोघा जखमींवर गुहागर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



गुहागरवरून असगोलीला गेलेली मिनीबस सकाळी १०.३० च्या सुमारास गुहागर खालचापाट येथील बँक ऑफ इंडिया समोर आली. यावेळी मिनीबसमध्ये सुमारे ४० प्रवासी होते. बँकेत कामाला जाणारे कर्मचारी येथे उतरत असताना मिडीबसच्या रेडिएटरचा पाईप फुटला. पाईपमधून गरम, हिरव्या पाण्याचा फवारा उडाला. यामुळे २५ जणांचे पाय भाजले. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे प्रवाशांची घाबरगुंडी उडाली. भीतीने गाडीतील प्रवासी बाहेर पडण्यासाठी धावपळ करू लागले. या धावपळीत एका वयस्क महिलेचा तोल गेला आणि ती गाडीबाहेर पडली. आणखी एक महिलाही या धावपळीत घसरून पडली. या दोन महिलांना गुहागरच्या ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.

## सुव्यवस्था राखण्यास सरकार अपयशी

**। नागपूर । प्रतिनिधी ।**

शपथविधी होऊनही अद्याप मंत्र्यांना खाती नाहीत. गेल्या पाच दिवसांपासून कायदा व सुव्यवस्था, आरोग्य, शेतकरी इत्यादी विषयांवर विरोधक चर्चा करीत आहोत. मात्र, सरकारला त्याचे गांभीर्य नाही. हे सरकार असूनही नसल्यासारखे आहे, कारण राज्याची कायदा व सुव्यवस्था राखण्यास सरकार अपयशी ठरल्याचा घणाघात विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेत केला आहे.

# मारहाण प्रकरणी राजकीय नेते एकवटले



**। कल्याण । प्रतिनिधी ।**

कल्याण पश्चिमेतील योगीधाममधील मराठी कुटुंबाच्या मारहाणीचे प्रकरणाचे तीव्र पडसाद उमटले आहेत. या प्रकरणी राजकीय पक्षांसह सामाजिक संस्था, व्यापारी संघटना आणि सोसायटीमधील रहिवाशांनी कल्याण परिमंडल ३चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांची भेट घेण्यात आली. यावेळी, मारहाण करणाऱ्या अखिलेश शुक्ला याला त्वरित अटक करून त्याचे निलंबन करण्यात यावे. तसेच, गुन्हा दाखल करण्यास उशीर करणाऱ्या एपीआय लांडगे यांचे देखील निलंबन करा आदी मागण्या नागरिकांनी केल्या आहेत.

यावेळी मनसेचे उल्हास भोईर, कस्तूरी देसाई, शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे विजय साळवी, रुपेश भोईर, नितीन जाधव, अतुल सरगर, योगीधाम उमेश वाघ, अरविंद मोरे, छाया वाघमारे, नेत्रा उगले, गणेश जाधव, अनघा देवळेकर, धनंजय जोगदंड आदी उपस्थित होते.

## सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपुर्ण निर्देश

# राज्यातील देवरायांना मिळणार संरक्षण

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

सर्वोच्च न्यायालयाने देवरायांच्या संरक्षणासाठी पावले उचलण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे राज्यातील इतर ठिकाणच्या देवरायांसह सिंधुदुर्गातील १ हजार ४९७ देवराया आता अधिक संरक्षित होणार आहेत. परंपरागतरित्या संरक्षित देवरायांच्या व्यवस्थापनासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करण्याचे महत्त्वपूर्ण निर्देश सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल विभागाला दिले आहेत.

देवरायांचे पर्यावरणीय आणि सांस्कृतिक महत्त्व जपण्यासाठी देशव्यापी सर्वेक्षण योजना विकसित करण्यास न्यायालयाने सुचविले आहे. पर्यावरण अभ्यासकांनी या निर्णयाचे स्वागत करताना हा ऐतिहासिक निर्णय असल्याचे म्हटले आहे.



सांस्कृतिक आणि जैविक महत्त्व लाभलेल्या देवरायांसारखा महत्त्वाचा अधिवास वाचवणे गरजेचे असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. देवरायांना वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत समुदाय राखीव क्षेत्राचा दर्जा देण्याबाबतच्या सूचनाही न्यायालयाने केली आहे. न्या. भूषण गवई, न्या. एस. व्ही.एन. भट्टी आणि न्या. संदीप मेहता यांच्या विशेष खंडपीठाने ही शिफारस राजस्थानच्या लुप्त होत चाललेल्या उपवनांवर प्रकाश टाकणाऱ्या याचिकेवर आधारित केली आहे.

कोकणातील निसर्गठेवापवित्र देवरायांना वेगवेगळ्या प्रदेशांत विविध नावाने ओळखले जाते. महाराष्ट्र सरकारने सिंधुदुर्ग, दोडामार्ग येथील दुर्मीळ कान्हळाची (मायरेस्टिका स्वॅम्प) देवराई आणि आंबोलीतील हिरण्यकेशी मातेच्या देवराईला जैवविविधता वारसास्थळाचा दर्जा दिला आहे. सिंधुदुर्गात किल्ले निवतीमध्ये डुंगोबाची देवराई कांदळवन व तिच्या सहयोगी अशा १२ प्रजातींसाठी प्रसिद्ध आहे.

### राज्यात साडेतीन हजार देवराया

**एका नोंदीनुसार रत्नागिरीत १ हजार ७३६, सिंधुदुर्गात १ हजार ४९७, पुण्यात २३६, कोल्हापूरात १८५, ठाण्यात ३२ देवराया असून संपूर्ण महाराष्ट्रात ३ हजार ७६८ इतक्या देवराया आहेत. संपूर्ण पश्चिम घाटातील देवराई, पवित्र उपवनांच्या संवर्धनासाठी हा ऐतिहासिक निर्णय आहे. या पवित्र उपवनांना सामुदायिक राखीव म्हणून अधिसूचित केल्याने समुदायाच्या सहभागासह जंगलांच्या या मूळ कप्प्यांचे संरक्षण आणि व्यवस्थापन होईल, असे पर्यावरण अभ्यासकांनी म्हटले आहे.**

### न्यायालयाच्या सूचना

**देवरायांचे क्षेत्र, स्थान आणि व्याप्ती ओळखण्यासाठी त्यांच्या सीमा स्पष्टपणे चिन्हांकित कराव्यात, मानवी वस्ती, शेती किंवा इतर कारणांमुळे जंगलतोड होऊन देवरायांचे आकार कमी होण्यापासून संरक्षण केले जावे, देवरायांची नैसर्गिक वाढ आणि विस्तार सामावून घेण्यासाठी या सीमा लवचिक असाव्यात.**



# साज प्रभाविष्काराचा

● पीएनपी महाविद्यालय वेश्वी येथे प्रभाविष्काराचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याप्रसंगी महाराष्ट्राचा महागायक अभिजीत कोसंबी, संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, युवराज पाटील यांच्या उपस्थितीने कार्यक्रमात रंगत आली. त्याचबरोबर नवरत्नांचा सन्मान, देशातील विविध पंथांची संस्कृती, फॅशन शो हे प्रमुख आकर्षण ठरले. पारंपारिक नृत्यांनी प्रभाविष्कारामध्ये विद्यार्थ्यांनी आपली कला सादर केली. अभिजीत कोसंबी यांच्या गायनाला महाविद्यालयातील विद्यार्थी आणि प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर उचलून घेतले होते. समारोपाला महागरब्याचा आनंद रसिक प्रेक्षकांनी घेतला. विविध गाण्यांवर प्रेक्षकांचे पाय थिरकले. (छायाचित्र : समीर मालोदे)

## श्रीवर्धनमध्ये न्याय यात्रा

**श्रीवर्धन:** गेले काही महिने बांगलादेश देशात हिंदु समाजाच्या नागरिकांना मारहाण करणे, त्यांच्यावर अत्याचार करणे, असे प्रकार होत आहेत.त्याच्या निषेधार्थ आपल्या देशात ठिकठिकाणी निषेधार्थ यात्रा निघत आहेत. श्रीवर्धनमध्येही रविवारी (दि.२२) सकल हिंदु समाज, श्रीवर्धन तर्फे बांगलादेश हिंदु न्याय यात्रा काढण्यात आली होती. या यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यात्रेमधील नागरिक जय श्रीराम,भाग जा भाग जा, बांगलादेशी भाग जा अशा घोषणा देत होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारीवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६ अलिबाग

● वरसोली, रायगड.. आदर्श नगर येथे N.A.४.५ गुंठे चे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत रु.६३ लाख प्रत्येकी, एकत्रित ५.०४ कोटी (५ कोटी ४ लाख) संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९

● किहीम, रायगड.. समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटर चा प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत रु .१.०५ कोटी, (१ कोटी ५ लाख) बंगल्या साठी योग्य - ९८२२२५७९२९

● नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. वेटर, ब्रेकफास्ट हेल्पर, हाऊस कीपर १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२

● अलिबाग-रिसॉर्टमध्ये कामासाठी माणसे पाहिजेत.
Reception-House Keeping-Waiter-Helper-Cook- etc.
Phone: ९३२३१५२९९०.

● अलिबागमधील ब्युटी पार्लर कामासाठी अनुभवी मुलगी पाहीजेत. ८१४९८६५६२५

● अलिबाग आणि परिसरातील Bsc, Bcom, BA पदवीधर उमेदवारांना Work From Home पद्धतीने कामकाज करण्याची सुवर्णसंधी. त्वरित संपर्क करा. ९४०३२१२१२१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## भंगार अड्ड्यावर कारवाई

**। वडखळ । प्रतिनिधी ।**

मुंबई- गोवा महामार्गावर परप्रांतीयांनी अनाधिकृतपणे भंगारच्या अड्डा उभारला असून या ठिकाणी कंपन्यांचा येणार माल चोरीद्वारे घेतला जात असल्याची माहिती दादर सागरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय कुमार ब्राह्मणे यांना मिळताच त्यांनी त्या ठिकाणी धाड टाकून जेएसडब्ल्यू कंपनीचा १० लाखांचा स्टील बार जप्त केला व आरोपीस अटक केली आहे.

रायगड जिल्ह्याच्या अनेक भागांमध्ये गेल्या काही दिवसांपासून अनाधिकृतपणे भंगारवाल्यांचे जाळे मोठ्या प्रमाणावर पसरले असून त्यातच जेएसडब्ल्यू कंपनी डोलवी येथून टीएमटी स्टील बार माल विविध कंपन्याना सप्लाय करण्यासाठी ज्योती स्ट्रान्सपोर्ट मधील ट्रेलर एमएच ४६. बीएम ६५८९ वरील चालक व ईतर काही ट्रेलर चालकांनी सदरचा पूर्ण माल विविध कंपन्याना न पुरविता अंदाजे १५ ते २० टन मालाचा अपहार करुन तो जिते येथील आकाशदीप हॉटेलच्या पाठीमागे मोकळ्या जागी अनाधिकृतपणे उभारलेल्या भंगारवाल्यांकडे उतरविले असल्याची माहिती फिर्यादी कंपनीचे जनरल मॅनेजर यांनी दादर सागरी पोलीस स्टेशनला दिली. त्यानुसार तपास करत दादर सागरी पोलीस निरीक्षक संजयकुमार ब्राह्मणे यांनी आपल्या पथकासह रात्रीच्या ८ च्या सुमारास आकाशदीप हॉटेलच्या पाठीमागे धाड टाकली.

# माथेरानकरांना शार्लोट लेकचे पाणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान शहराला नेरळ जवळील उल्हास नदीमधून केला जाणारा पाणी पुरवठा पंप हाऊसमधील बिघाडानंतर बंद पडला होता. तब्बल १६ दिवसानंतर देखील उल्हास नदी मधून उचलले जाणारे पाणी उचलणे बंद आहे.

दरम्यान, गेल्या सात डिसेंबर पासून उल्हास नदीवरील कुंभे पंप हाऊसमधील बिघाडामुळे पाणी उचलणे बंद आहे. त्याचवेळी वॉटर पाईप येथील पंप हाऊसमध्येदेखील बिघाड झाला असून गेल्या १६ दिवसापासून माथेरान शहराला तेथील शार्लोट लेकमधून पाणी उचलले जात आहे. त्यामुळे माथेरान शहरातील शार्लोट लेक रिकामे होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

काही दिवसांनी नाताळ आणि नवीन वर्षाचे स्वागत करण्याचे हंगाम आहे. या पर्यटन हंगामात हजारो पर्यटक माथेरान येथे येत असतात.मात्र त्या आधी दहा दिवस माथेरानमध्ये पिण्याच्या पाण्याच्या टंचाईने शहरातील नागरिकांना त्रस्त केले आहे.शहरात अनेक भागात पिण्याचे पाणी वेळेवर पोहचत नाही.दुसरीकडे माथेरान शहरात दररोज येणारे पर्यटक आणि शनिवार रविवारी विकेंड लक्षात घेवून पर्यटकांची गैरसोय होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

नेरळ येथील कुंभ येथे असलेल्या पंप हाऊसमधून दररोज १८-२० तास पाणी उचलून माथेरान येथे पाठवले जाते.त्याचा फायदा माथेरानमधील शार्लोट लेकमधील पाणीपुरवठा शहरासाठी राखीव ठेवण्यात येत असतो. नेरळ जवळील उल्हास नदी वरील कुंभे येथील पंप हाऊसमधील येथे बिघाड झाले आहे. त्यामुळे सात डिसेंबरपासून उल्हास नदीवरून माथेरानसाठी पाणी सोडण्यात आलेले नाही.

उल्हास नदीवरून दररोज उचलले जाणारे पाणी यामुळे माथेरान शहरातील शार्लोट लेकमध्ये मे महिनाअखेर तलावात पाणी साठवले असायचे. मात्र उल्हास नदीवरून उचलले जाणारे पाणी हे उचलणे तांत्रिक बिघाडामुळे बंद झाले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडून त्याबाबत गेली १५ दिवस दुरुस्तीची कामे सुरु आहेत. त्यात उल्हास नदी वरून उचलले जाणारे पाणी हे पुढे जुम्मापट्टी येथील पंप हाऊस पर्यंत पोहचले जाते. माथेरान घटवून जाणारे पाणी अधिक दाबाने ८०० मीटर उंचीवरील माथेरान शहरात पोहचावे यासाठी जुम्मापट्टी आणि वॉटर पाईप येथे पंप हाऊस बनविण्यात आले आहे. मात्र उल्हास नदी येथील कुंभे पंपहाऊस पाठोपाठ वॉटर पाईप येथे पंप हाऊसमध्ये झालेला बिघाड दूर करण्यात जीवन प्राधिकरणाला यश आलेले नाही. तेथील दोन्ही पंप बिघडले असून तेथील मोटारींमध्येदेखील बिघाड झाला आहे.

# शिवप्रेमींनी केली पद्मदुर्ग किल्ल्याची स्वच्छता

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

पद्मदुर्ग जागर व गड संवर्धन संस्थांच्या वतीने पद्मदुर्ग किल्ल्यात स्वच्छता मोहिमेला सुरूवात करण्यात आली. यावेळी पद्मदुर्ग जागर व गड संवर्धन संस्थेचे अध्यक्ष आशिलकुमार ठाकुर, राहुल कासार, महेंद्र मोहिते, योगेश सुर्वे, अच्युत चव्हाण, मिलिंद भगत, सुनील शेळके, रुपेश जामकर, संदीप घरत, संतोष जंजिरकर, संदेश म्हात्रे जयवंत देडगे, खारअंबोली येथील शिवप्रेमी ग्रुप आदिंसह शिवप्रेमी या स्वच्छता मोहिमेत उपस्थित होते.



पद्मदुर्ग जागर व गड संवर्धन संस्थांच्या वतीने पद्मदुर्ग किल्ला स्वच्छता करायचा आहे असे आवाहन केले होते. त्या आवाहनाला शिवप्रेमीनी चांगला प्रतिसाद देऊन कोयता, झाडु, पहार, पंजा, पिकाव, फावडे इत्यादी साहित्य घेऊन सकाळच्या दरम्यान खोरा बंदरावरुन बोटीने पद्मदुर्ग किल्ल्यात आगमन केले. प्रथम शिवप्रेमीनी गडपूजन तद्नंतर दुर्गादेवी कोटेश्वरी मातेचे पूजन करून किल्ला स्वच्छतेला सुरुवात करण्यात आली. गडावरील तोफा स्वच्छता करण्यात आल्या. गडावरील मोठ मोठी झाडे तोडण्यात आली.

गवत काढण्यात आले. बॉटल, प्लॉस्टीक पिशव्या आदी वस्तू उचलण्यात आल्या. गवत एक जागी नेऊन जाळण्यात आले. तद्नंतर सर्व शिवप्रेमींकडून राजे शिवछत्रपती महाराजांना मानवंदना देण्यात आली. ३५० वर्षापूर्वी उन्मत्त झालेल्या सिद्दीला नामोहरम करण्यासाठी छत्रपती शिवराय व शंभुराजे आणि जिगरबाज मावळ्यांनी मुरुड समुद्रकिनारा पासून तीन किलोमीटर अंतरावर अरबी समुद्रात राजे शिवछत्रपती महाराजांनी पद्मदुर्ग किल्ल्याची निर्मिती केली. परंतु अजुनपर्यत आपल्या राज्यकर्त्यांना किल्ला संवर्धन व जतन करता आला नाही. मागील १९ जानेवारी २०२३ या दिवशी लोकप्रतिनिधीनी पद्मदुर्ग किल्ल्याला भेट देऊन प्रत्यक्ष पहाणी केली. पद्मदुर्ग किल्ल्यावर पर्यटकांना सहज उतरता यावे यासाठी तातडीने जेट्टीची उभारणी करण्याचे आदेश दिले.त्याचप्रमाणे किल्ल्याच्या दुरुस्तीसाठी कोणताही निधी कमी पडू देणार नसून अधिकारी वर्गाने तातडीने प्रस्ताव तयार करून संबंधित खात्याकडे पाठवा त्याचा मी स्वतः पाठपुरावा करून निधी व कामाची मान्यता आणून देईन असे सांगण्यात आले होते. परंतु आज ११ महिने होऊन गेले तरी किल्ल्याला ना निधी ना संवर्धन. यामुळे किल्ल्याची पडझड थांबलेली नाही. अजुन किती वेळ घेणार या किल्ल्याच्या संवर्धनासाठी असा प्रश्न शिवप्रेमी विचार आहेत, अशी प्रतिक्रिया पद्मदुर्ग जागर व गड संवर्धन संस्थेचे अध्यक्ष आशिलकुमार ठाकुर यांनी दिली.

# देऊळकोंड शाळेला कुलूपप्रकरणी ग्रामस्थ आक्रमक

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

लोहारे ग्रामपंचायत हद्दीतील देऊळकोंड येथील रायगड जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा आठवडाभरापेक्षा अधिककाळ बंद असून याबाबतीत ग्रामस्थांनी त्यांच्या संतप्त भावना केंद्रप्रमुख कुर्डूनकर यांच्या भेटीवेळी व्यक्त केल्या.

याप्रकरणी शिक्षणविस्तार अधिकारी यांनी शिक्षकाच्या दांडीबद्दल केंद्रप्रमुखांनी अहवाल दिल्यास गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे कारवाईची शिफारस करणार असल्याची माहिती प्रतिनिधीस दिली. यासंदर्भात गट शिक्षण अधिकारी वसावे यांनी प्रतिनिधीस अधिकृत कारवाईची माहिती देण्याऐवजी मोबाईल रिसीव्ह करणे टाळल्याने याप्रकरणी पोलादपूर पंचायत समितीच्या शिक्षण विभागाकडून कानावर हात ठेवून दांडीबहाद्दर शिक्षकाची पाठराखण केली जाण्याची शक्यता वाढली आहे.

पोलादपूर तालुक्यात शिक्षण विभागाच्या आणि शिक्षक संघटनांच्या अनोख्या ऐक्यामुळे शिक्षकांच्या शिक्षणेतर कामांसाठीच्या दांड्यांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याच्या घटना वाढल्या आहेत. २-४ पटसंख्या असलेल्या प्राथमिक शाळांवर अर्धा पाऊण लाख रूपये पगार असलेल्या शिक्षकांकडून नोकरी करण्याबाबत अनुत्सुकता वेळोवेळी स्पष्ट झाली आहे. पोलादपूर पंचायत समितीच्या शिक्षण विभागात गटशिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार पाहणारे सुभाष साळुंखे हे सध्या शिक्षणविस्तार अधिकारी पदावर कार्यरत आहेत तर वसावे यांच्याकडे गटशिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार आहे.

पोलादपूर नजिकच्या लोहारे देऊळकोंड येथील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेचे शिक्षक तुकाराम इंगवले हे एक आठवड्यापेक्षा अधिक काळ शाळेकडे फिरकले नसल्याने दोन विद्यार्थी आडवाटेने लोहारे गावठाणातील प्राथमिक शाळेत जात आहेत. याप्रकाराची माहिती नसलेले केंद्रप्रमुख कुर्डूनकर यांनी शनिवारी सकाळी शाळा सुरू झाल्यानंतर लोहारे देऊळकोंडच्या रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेला भेट दिली. यावेळी शाळा बंद असल्याबाबत केंद्रप्रमुखांनी ग्रामस्थांसोबत चर्चा केली. याप्रसंगी लोहारेचे माजी सरपंच प्रदीप सुर्वे यांनी शिक्षक तुकाराम इंगवले गेल्या आठ-दहा दिवसांपासून येत नसल्याचे सांगितले. सुर्वे यांनी सदर प्रकाराची माहिती प्रतिनिधीस देऊन केंद्रप्रमुख कुर्डूनकर यांच्यासोबत मोबाईलवरून संभाषण करून दिले असता इंगवले हे शिक्षक केंद्रांतर्गत क्रीडा व अन्य स्पर्धात्मक उपक्रमांवेळीदेखील गैरहजर असल्याने ही बाब निदर्शनास आल्यामुळे व्हिजिट केल्याचे सांगितले.

याप्रकारासंदर्भात प्रतिनिधीने गटशिक्षणाधिकारी वसावे यांच्याकडे चौकशी करण्यासाठी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला तर इफ यु थिंक यु आर बॅड, आय एम युवर डॅड अशी व्हाटसॲप स्टेटसवर प्रौढी मिरविणाऱ्यांनी मोबाईल कॉल स्वीकारला नाही. यामुळे शिक्षणविस्तार अधिकारी सुभाष साळुंखे यांच्यासोबत संपर्क साधल्यावर त्यांनी प्रस्तुत प्रतिनिधीस केंद्रप्रमुखांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे कारवाईसाठी शिफारस करण्यात येईल, अशी माहिती दिली.

एकूणच, शिक्षकाच्या दांडी मारण्याच्या या प्रकाराची वाच्छता आता मोठया प्रमाणात होत असताना प्रशासक असलेल्या पंचायत समितीचे अधिकारी संबंधित शिक्षकाविरूध्द कारवाई करतील अथवा सामंजस्य प्रस्थापित करतील, याबाबत जोरदार चर्चा सुरू आहे.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

# दाट धुक्यामुळे वाटा हरपल्या

## वाहनचालकांना धीम्यागतीने करावा लागला प्रवास



**। कोलाड । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यात थंडी सुरू होताच वातावरणात मोठ्या प्रमाणात बदल घडत असल्याचे दिसुन येत आहेत. मागील दोन दिवसांपासून पहाटे मोठ्या प्रमाणात सगळीकडेच दाट धुक्याची चादर पसरली असल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे वातावरणात सुद्धा मोठ्या प्रमाणात गारवा निर्माण झाला आहे.

पहाटेच्या दाट धुक्यामुळे रोहा कोलाड मार्ग तसेच ग्रामीण भागातील सडक मार्गावर वाहतुकीस मोठ्या प्रमाणात अडथळा होत असताना दिसून येत होता. ग्रामीण भागातील सडकेच्या दुतर्फा मार्गाला उंच वाढलेले काटेरी झुडपे आणि गवत त्यामुळे समोरील येणारी वाहन किंवा पादचारी माणूस पाच ते सहा फुटाच्या अंतरावर दिसून येते नसल्यामुळे दुचाकीस्वार चालकांना मोठी तारेवरची कसरत करावी लागत होती.

रोहा तालुक्यातील खांब, देवकान्हे परिसरात पहाटेच्या सुमारास धुक्याचे प्रमाण इतके होते की, वाहनचालकांना वाहने चालवताना चार ते पाच फुट अंतरावरील काहीच दिसत नव्हते. त्यामुळे अनेक वाहनचालकांना धीम्यागतीने वाहने चालवावी लागत होती. थंडीसहित धुके त्यातच हलकासा दव यामुळे थंडावा निर्माण होत आहे. धुक्यात जणू काही रस्तेच हरवले होते.

## रहिवासी सेवा संघाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**पाली/बेणसे :** सुधागड तालुका रहिवाशांच्या शैक्षणिक व सामाजिक विकासासाठी कार्यरत असलेल्या ठाणे शहरातील सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ ठाणे या संस्थेच्या २०२५ दिनदर्शिकेचे प्रकाशन संस्थेच्या कार्यालयात करण्यात आले. यावेळी विजय पवार, विजय जाधव, प्रकाश शिलकर, शंकर काळभोर, जनार्दन घोंगे, चिमाजी कोकाटे, विठ्ठल खेरटकर, रमेश सागळे, गणपत डिगे, अनिल सागळे, सुरेश शिंदे, राकेश थोरवे, दत्ता सागळे, अनिल चव्हाण, राम भोईर, श्याम बगडे, सखाराम चव्हाण, सखाराम घुले, भगवान तेलंगे, राजेश बामणे, प्रवीण बामणे,अजय जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

# नेरळ माथेरान मिनीट्रेनचा धुक्यातून प्रवास



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

रविवारी प्रचंड धुके वातावरणात होते आणि त्यामुळे सकाळी माथेरानसाठी निघणारी नेरळ माथेरान नेरळ मिनीट्रेनदेखील धुक्यातून वाट काढत माथेरान येथे पोहचली. माथेरानसाठी निघालेले पर्यटक प्रवासी हे धुक्यातून जाणाऱ्या गाडीचे भाग्यवान प्रवासी ठरले आहेत.

दरम्यान, धुकेमय वातावरणामुळे नेरळ माथेरान नेरळ मिनीट्रेनचा प्रवासदेखील मंदावला होता आणि त्यामुळे काहीशी उशिरा मिनीट्रेन माथेरान येथे पोहचली.

नेरळ येथून माथेरानकडे जाणारी प्रवासी ट्रेन सकाळी आठ वाजून ५० मिनिटांनी जाण्यासाठी निघते. सकाळपासून धुकेमय वातावरण असल्याने सकाळी निघणारी नेरळ माथेरान मिनीट्रेन दहा मिनिटे उशिराने नेरळ स्थानकातून निघाली. नेरळपासून निघालेल्या मिनीट्रेनचा प्रवास नऊ वाजता सुरु झाला. त्यावेळी मिनीट्रेनचे इंजिन हे लाईट सुरु करून प्रवास सुरु झाला. पहाटेपासून असलेले धुके हे दहा वाजेपर्यंत कायम होते आणि त्यामुळे आज मिनीट्रेनमधून प्रवास करणारे पर्यटक प्रवासी हे धुक्याच्या दुलईमधून माथेरानकडे प्रवास करीत होते. त्यात सकाळी असलेले धुके यामुळे मिनीट्रेनचा प्रवासदेखील काहीसा मंदावला होता. त्यामुळे नेरळ येथून निघालेली मिनीट्रेन आपल्या निश्चित वेळेपासून अर्धा तास उशिराने माथेरान स्थानकात पोहचली. त्यात धुके असल्याने मिनीट्रेनचे वाहक यांची मार्ग शोधताना कसरत दिसून आली.

या गाडीतून प्रवास करणारे नालासोपारा येथून आलेले पर्यटक ए.एन. राऊत यांनी धुक्यातून जाणारी गाडी आणि त्यातून जाणारी गाडी, मध्येच गाडीमध्ये धुके आम्हा प्रवाशांच्या अंगा खांद्यावर धुके येत होते. हा आगळावेगळा अनुभव आम्ही पर्यटक अनुभवत होतो. त्याचवेळी पावसाळ्यात माथेरानच्या मिनीट्रेनमधून जाताना धुके गाडीत प्रवेश करते तसेच धुके आज अनुभवले आणि आम्ही आनंदी झालो अशी प्रतिक्रिया प्रवासी व्यक्त करीत होते. मात्र आज पहिल्यांदा मिनीट्रेन धुकेमय वातावरणातून प्रवास करीत असल्याचे अनेक रेल्वे प्रवासी बोलत होते.

## ॲड. राजन सावंत यांना मातृशोक



**नागोठणे :** रोहा शहरातील एक्सेल कॉलनी परिसरातील रहिवासी लता भीमराव सावंत (वय ९२) यांचे मंगळवारी (दि. १७) सायंकाळी ४.३० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले.

दिवंगत सेवानिवृत्त उपविभागीय अधिकारी भीमराव सावंत यांच्या त्या पत्नी व रोहातील ज्येष्ठ विधीज्ञ राजन सावंत यांच्या त्या आई होत. त्यांच्या पश्चात तीन विवाहित मुलगे, एक विवाहित मुलगी, सुना, जावई, नातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे.

लता सावंत यांच्या पार्थिवावर रोहा येथील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे दशक्रिया विधी बुधवारी (दि.२६) तर उत्तरकार्य रविवारी (दि.२९)रोहा येथेच राहत्या घरी होणार आहेत.


## दमयंती म्हात्रे यांचे निधन



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

खोपटे म्हात्रेपाडा येथील दमयंती म्हात्रे यांचे नुकतेच वयाच्या ६८ व्या वर्षी निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर खोपटे येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते राजेंद्र म्हात्रे व हेमंत म्हात्रे यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात राजेंद्र म्हात्रे व हेमंत म्हात्रे असे दोन पुत्र, तर ज्योती म्हात्रे व निशा म्हात्रे या दोन सुना तसेच नेहल, काजल, संस्कृती, खुशी, साक्षी व स्मित अशी सहा नातवंडे असा आप्त परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी शुक्रवारी (दि.२७)खोपटे येथील नाना- नानी पार्क येथे तर उत्तरकार्य विधी रविवारी (दि.२९) खोपटे म्हात्रेपाडा येथील राहत्या घरी ठीक बारा वाजता होणार असल्याची माहिती म्हात्रे कुटुंबियांतर्फे देण्यात आली.

# शिवशांती स्नेहालय वृद्धाश्रम संस्थेतर्फे आरोग्य शिबीर



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शिवशांती स्नेहालय वृद्धाश्रम व विरंगुळा केंद्र, अलिबाग आणि अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर साठ्ये यांच्या संयुक्त विद्यमाने भारती दीनानाथ तरे सभागृह, श्रीबाग येथे नुकतेच ज्येष्ठांसाठी आरोग्य शिबीर घेण्यात आले. या शिबिरात ७० ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

या आरोग्य शिबिरात अस्थी सांधे आरोग्य जागरुकता कार्यक्रमाअंतर्गत डॉ. चंद्रशेखर साठ्ये यांनी अस्थीविकार टाळण्यासाठी आपला आहार कल्शियम व व्हिटॅमिन डीयुक्त असण्यासाठी कोणते अन्नप्रकार घ्यावे याचे मार्गदर्शन करताना प्रथिने व जीवनसत्वयुक्त आहारात कोणत्या भाज्या, कडधान्ये व तेलबिया, अंडी, दुग्धयुक्त पदार्थांच्या प्रमाणाबाबत ज्येष्ठांना सविस्तर माहिती दिली. प्रारंभी निरोगी राहण्यासाठी नियमित चालणे व काही व्यायामप्रकार करणे याबाबत प्रात्यक्षिकांसह माहिती देण्यात आली.तसेच ज्येष्ठांकडून हातापायाचे, कमरेचे व मानेचे व्यायामप्रकार करुन घेतले.

यावेळी उपस्थित ६० ज्येष्ठ नागरिकांची शारिरीक तपासणी करुन त्यांना मोफत औषधोपचार करण्यात आले. डॉ. सुभाष म्हात्रे, डॉ. सुरेश म्हात्रे, डॉ. अनिल डोंगरे, डॉ. अपूर्वा कुलकर्णी-पाटील, डॉ. सौरभ त्रिपाठी (आयुर्वेदिक), डॉ. श्रद्धा सावंत, डॉ. श्रुती सागर, डॉ. सागर खडसे (आर्थोपेडिक सर्जन), डॉ. आशिष मिश्रा आदींनी विविध प्रकारच्या तपासण्या केल्या.

हे आरोग्य शिबीर यशस्वी होण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुभाष म्हात्रे, सचिव डॉ. प्रतिभा म्हात्रे, सहसचिव, तथा ज्येष्ठ नागरिक संस्था, अलिबागचे अध्यक्ष प्रफुल्ल राऊत, खजिनदार डॉ. जगदीश थळे, कार्यकारिणी सदस्य ॲड. मनोज पडते, योगेश तरे, भारती दीनानाथ तरे यांनी खूप मेहनत घेतली. तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी व सभासद यांनी मोलाचे सहकार्य केले. प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुभाष म्हात्रे यांनी केले. शेवटी प्रफुल्ल राऊत यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री. विकास आत्माराम पाटील यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| रेवदंडा, ता. अलिबाग जि. रायगड | १९८/१/अ | क्षेत्र ०.४५.०० पो.ख. ०.००.०० एकूण ०.४५.०० | २.१६ |

वर नमुद मिळकतीपैकी ०.३०.०० हे. आर.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.

दिनांक : २१/१२/२०२४

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. प्रमोद केशव पाटील व श्री. प्रभाकर केशव पाटील दोघेही रा. चोंढी पुल, बामणसुरे, पो. चोंढी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या वडिलोपार्जित, अविभक्त हिश्श्याच्या मौजे बामणसुरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथे खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**अ. शेतजमीन मिळकती**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| बामणसुरे ता. अलिबाग जि. रायगड | ५१ | ०-१२-८० पो.ख. ०-००-३० ०-१३-१० | ३.०० |
| | ५० | ०-१८-८० | ०.६४ |
| | १११ | ०-३१-५० पो.ख. ०-०९-०० ०-४०-५० | ०.५६ |
| | ९८ | ०-२८-०० पो.ख. ०-०१-०० ०-२९-०० | १.०० |
| | ९९ | ०-५६-८० पो.ख. ०-०७-६० ०-६४-४० | १३.७९ |
| | ७३ | ०-०२-०० पो.ख. ०-०१-०० ०-०३-०० | ०.०२ |
| | ८२ | ०-०५-० | |

सदरहू मिळकती व घर मिळकतींसंबंधी श्री. सुधाकर केशव पाटील रा. भांडुप, मुंबई यांनी श्री. प्रमोद केशव पाटील, श्री. प्रभाकर केशव पाटील, श्री. कमलाकर केशव पाटील, जयश्री विनायक पाठारे, श्रद्धा संजय पाठारे, निशिगंधा निशिकांत म्हात्रे, श्री. मधुकर केशव पाटील यांच्याविरुद्ध अलिबाग येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टात रेग्युलर मुकदमा नं. ८३/२०२१ ने सरस-निरस वाटपाकरीता व तुर्तातुर्त मनाई हुकुमाच्या आदेशाकरीता दावा दाखल केलेला आहे. सदरहू दावा हा प्रलंबित असून न्यायप्रविष्ठ आहे.

सदरहू दाव्यामध्ये तुर्तातुर्त मनाई हुकूमाच्या अर्जावर सुनावणी होऊन दि. ०६/०३/२०२४ रोजी आदेश झालेले आहेत व अलिबाग येथील सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टाने दावा मिळकती विकू नयेत व मिळकतींमध्ये त्रयस्थ इसमांचे हक्क निर्माण करू नये असे आदेश केलेले आहेत.

दावा मिळकतींसंबंधी अद्याप अलिबाग येथील दिवाणी न्यायालयात चालू असलेल्या रेग्युलर मुकदमा नं. ८३/२०२१ मध्ये दावा मिळकतींचे सामाईक कब्जेदार यांचा किती हिस्सा आहे हे ठरलेले नाही. तसेच दावा मिळकतींचे सरस-निरस वाटपाचे आदेशसुद्धा झालेले नाहीत. असे असताना दाव्यातील वादी श्री. सुधाकर केशव पाटील व प्रतिवादी नं. ७ श्री. मधुकर केशव पाटील हे संगमनत करून अनाधिकाराने व बेकायदेशीरपणे दावा मिळकतींपैकी काही मिळकती या त्रयस्थ इसमांस विकण्यास काढलेल्या आहेत असे आमच्या अशिलांस खात्रीलायक समजते.

आमच्या अशिलांनी दिलेल्या माहितीवरून व त्यांच्या सांगण्यावरून या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे बामणसुरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. ५१, १११, ९८, ९९, ७३ व ८२ या जमीन मिळकतींसंबंधी श्री. सुधाकर केशव पाटील व श्री. मधुकर केशव पाटील यांच्याबरोबर रेग्युलर मुकदमा नं. ८३/२०२१ हा प्रलंबित असताना कुणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्रीचा अथवा हस्तांतरणाचा व्यवहार करू नये. याउपर कुणीही अथवा त्रयस्थ इसमांनी मिळकतींसंदर्भात हस्सांतरणाचा व्यवहार केल्यास तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी व व्यवहाराच्या अनुषंगाने आमचे अशिल हे त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करतील याचीसुद्धा नोंद घ्यावी.

अलिबाग

दि. २२/१२/२०२४

**ॲड. नंदकुमार पी. तांबडकर**
जिल्हा न्यायालय, अलिबाग
मु.पो. सुडकोली
ता. अलिबाग, जि. रायगड
(मो.नं. ९०११७७९०८१)

### जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे पालव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान श्री. मालक सुधीर लक्ष्मण घरत यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| पालव ता. अलिबाग जि. रायगड | ७/३/क | क्षेत्र ०.३७.०० पो.ख. ०.००.०० एकूण ०.३७.०० | १.४१ |

वर नमुद मिळकतीपैकी विद्यमान मालकांच्या मालकीचे क्षेत्र ०.१६.९० हे. आर आकार ०.६४ रू. पैसे

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.

दिनांक : २१/१२/२०२४

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

### महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ : कार्यकारी अभियंता, मुंबई प्रदेश किरोल रोड : विद्याविहार [पश्चिम] : मुंबई-400 086

Email. eemumbai@rediffmail.com Phone ०२२-२५१३६३०३

क्र.राप/काअमुं/ईनिविदा/१२११ दिनांक:१९/१२/२०२४

**ई-निविदा सुचना क्रमांक ०८ सन २०२४-२५**

कार्यकारी अभियंता, रा.प.मुंबई प्रदेश, किरोल रोड, विद्याविहार (प) मुंबई-८६ दूरध्वनी क्र. २५१३६३०३ हे काम क्र. 1 करीता अनोंदणीकृत परंतु अनुभवी व तांत्रिक/आर्थिक दृष्टया सक्षम असलेल्या ठेकेदारांकडुन ई-निविदा मागवित आहेत. तसेच काम क्र. २ ते ५ साठी सार्वजनिक बांधकाम खाते महाराष्ट्र राज्य यांचेकडे योग्य त्या वर्गात नोंदणीकृत असलेल्या ठेकेदारांकडुन ई-निविदा मागवित आहेत.

| ई-ID क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम रु |
|---|---|---|
| ११२५९२३_१ | रा.प. सिंधुदुर्ग विभागातील विभागीय कार्यशाळा कणकवली इमारतीचे नुतनीकरण व वाहनतळाचे कॉंक्रीटीकरण करणे. | ६०७२५८९३.०० |
| ११२५९२३_२ | रा.प. ठाणे विभागातील मलंगगड बसस्थानकाचे नुतनीकरण करणे. | १२१२६६०५.०० |
| ११२५९२३_३ | रा.प. रायगड विभागातील म्हसळा बसस्थानकाचे नुतनीकरण करणे. (दुसरी मागणी) | १८५५४१३.०० |
| ११२५९२३_४ | रा.प. रत्नागिरी विभागातील शिवाजीनगर बसस्थानक चिपळुण येथील चालक वाहक विश्रांतीगृहावर शेड उभारणे. (दुसरी मागणी) | १६५२४५९.०० |
| ११२५९२३_५ | रा.प. रत्नागिरी विभागातील चिपळुण आगारात दोन गाळयांनी विस्तार करणे. (दुसरी मागणी) | १६९४६१७.०० |

**ई-निविदेचे वेळापत्रक**

| क्र. | महामंडळाचा टप्पा | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | निविदा डाउनलोड व विक्री व तयार करणे | २३.१२.२०२४ | ११.०० |
| 2 | ऑनलाईन निविदा विक्री बंद करणे | ०८.०१.२०२५ | १६.०० |
| 3 | तांत्रिक व वाणिज्य लिफाफा उघडणे, शक्य झाल्यास | १०.०१.२०२५ | ११.०० |
| 4 | देकार पुर्व बैठक (काम क्र. १ साठी) | ३०.१२.२०२४ | ११.०० |

**टीपः- १.** सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदा पत्रात डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या **https://mahatenders.gov.in** वर मदत घेणे आवश्यक आहे. तसेच महामंडळाच्या **www.msrtc.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. **२.** इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई- निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

**कार्यकारी अभियंता**
**रा.प.मुंबई प्रदेश (कुर्ला)**

### नमुना "झेड"

**म.स.स.अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ पोटनियम {११(ड/१)} अन्वये स्थावर मालमत्तेचा ताबा घेणेबाबतचे नोटीस**

जा.क./९०/१९/२३/२८-६३६/व.अ./साप्रे/२०२४
वसुली अधिकारी, (म.स.सं.अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)
द्वारे साई प्रेरणा को.ऑप केडिट सोसायटी लि.
ऑफिस नं.२१०, २ रा मजला, देवी अन्नपुर्णा प्रिमायसेस को-ऑप
सोसायटी लि., प्लॉट नं.८, सेक्टर १८, वाशी, नवी मुंबई ४०० ७०५
दुरध्वनी क.०२२-४६०८९८४१ / ४२
Email : srosaiprerna@gmail.com
दिनांक : २०/१२/२०२४

ज्या अर्थी खाली सही करणार, मा.वसुली अधिकारी **वि.दि.कणसे** (म.स.स.अधिनियम १९६० कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये) यांनी दि.२०/१२/२०२१ रोजीची रक्कम **रू.५१,९७,८२७/- (अक्षरी रक्कम रूपये एक्कावन्न लाख सत्यान्नव हजार आठशे सत्तावीस फक्त)** ची मागणी नोटीस लवादी थकबाकीदार **श्री.आशिष शरद चेंबुरकर** यांना दिल्यानंतरही ऋणको यांनी रक्कम भरणा करणेस कसूर केला आहे.

या कार्यालयाने दि.१०/०५/२०२३ रोजीची जप्तीची नोटीस दिली असून खालील नमूद मालमत्ता दि.२६/०५/२०२३ च्या पंचनाम्यान्वये जप्त करून मा.वसुली अधिकारी यांनी म.स.स.नियम १९६१ मधील नियम १०७ {११(ड/१)} अन्वये सदर मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे आणि दि.२०/०६/२०२३ रोजीच्या आदेशान्वये सदरची जप्ती कायम करण्यात आलेली आहे.

विशेषतः ऋणको आणि सर्व नागरिकांना याद्वारे सुचित करण्यात येते की, सदर मालमत्ते संबधी कोणताही व्यवहार करू नये आणि असा व्यवहार केल्यास **साई प्रेरणा को.ऑप.केडिट सोसायटी लि.** यांच्या बोज्याची दि.२०/१२/२०२४ अखेर येणे रक्कम **रू.५१,४४,५१९/-** व त्यावरील व्याज आणि वसूली खर्च याला अधिन रहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

**मा.जिल्हाधिकारी - रायगड, मा.तहसिलदार - कर्जत , मा.सह दुय्यम निबंधक - कर्जत क. २, मा.तलाठी सो.- मौजे कळंब, ता.कर्जत, जि.रायगड**

**अ) मौजे कळंब, ता.कर्जत, जि.रायगड येथील - बिन शेती (अकृषीक) जमिन**

| अ.क | मालकाचे नाव | गट क. | क्षेत्र (चौ.मि.) | आकार रू. | आकार पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.आशिष शरद चेंबुरकर | १९२/३ चे क्षेत्र → | २०५ | २० | ५० |
| २ | | १९२/४ चे क्षेत्र → | २०५ | २० | ५० |
| ३ | | १९२/५ चे क्षेत्र → | २०३ | २० | ३० |
| ४ | | १९२/६ चे क्षेत्र → | २०३ | २० | ३० |
| ५ | | १९२/७ चे क्षेत्र → | २०३ | २० | ३० |
| ६ | | १९२/८ चे क्षेत्र → | २१९ | २१ | ९० |
| ७ | | १९२/९ चे क्षेत्र → | २०२ | २० | २० |
| ८ | | १९२/१० चे क्षेत्र → | २८६ | २८ | ६० |
| ९ | | १९२/११ चे क्षेत्र → | २०५ | २० | ५० |
| १० | | १९२/१२ चे क्षेत्र → | २०५ | २० | ५० |
| ११ | | १९२/१३ चे क्षेत्र → | ३१० | ३१ | ०० |
| १२ | | १९२/१४ चे क्षेत्र → | २२५ | २२ | ५० |
| १३ | | १९२/१६ चे क्षेत्र → | १९९ | १९ | ९० |
| १४ | | १९२/१९ चे क्षेत्र → | २१९ | २१ | ९० |
| १५ | | १९२/२० चे क्षेत्र → | २३० | २३ | ०० |
| १६ | | १९२/२१ चे क्षेत्र → | २१९ | २१ | ९० |
| १७ | | १९२/२२ चे क्षेत्र → | २०५ | २० | ५० |

**ब) मौजे कळंब, ता.कर्जत, जि.रायगड येथील - बंगला**

| अ.क. | मालकाचे नाव | ग्रामपंचायत मिळकत नं. | मिळकतीचे वर्णन | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.आशिष शरद चेंबुरकर | १७२९ | (आर.सी.सी.बंगला) प्लॉट नं.२२ | ९०० चौ.फुट |

**चर्तुसिमा -**

| पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
|---|---|---|---|
| दि रिज रिसॉर्ट | प्रायमरी हेल्थ सेंटर | पोशिर नदी | तलाठी कार्यालय |

(शिक्का)

सही/-
**वि.दि.कणसे**
**वसुली अधिकारी**
(म.स.स.अधिनियम १९६० कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)

दिनांक : २०/१२/२०२४
ठिकाण : नवी मुंबई - ४०० ७०५

## बळीराम क्रीडा मंडळाचा कबड्डी महोत्सव

# 'गुड मॉर्निंग' ठरला चषकाचा मानकरी




**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बळीराम क्रीडा मंडळाच्या ५१व्या कबड्डी महोत्सवानिमित्त काळाचौकी येथील आंबेवाडीतील बळीराम मंडळाच्या पटांगणावर कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पुरुष प्रथम श्रेणी गटात गुड मॉर्निंग स्पोर्ट्सने जेतेपद पटकावले आहे. तर, गुड मॉर्निंगचा शार्दुल पाटील स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला आहे.

पुरुषांच्या प्रथम श्रेणी गटातील अंतिम सामन्यात गुड मॉर्निंगने लायन्स स्पोर्ट्सचा प्रतिकार ४२-३३ असा मोडून काढत बळीराम चषक आपल्या नावे केला आहे. गुड मॉर्निंगने सुरुवात आक्रमक करीत २ लोण देत पूर्वार्धात १९-१४ अशी आश्वासक आधाडी घेतली. उत्तरार्धात आणखी एक लोण देत आपले विजेतेपद निश्चित केले. लायन्सने देखील पूर्वार्धात लोणची परतफेड करीत कडवी लढत दिली. गुड मॉर्निंगने पूर्ण डावात ६ बोनस व एक अव्वल पकड केली, तर लायन्सने पूर्ण डावात ७ बोनस गुण करीत सामन्यातील रंगत कायम ठेवली होती. यावेळी, गुड मॉर्निंग स्पोर्ट्सला रोख रक्कम रु. १० हजार १ व चषक देऊन गौरविण्यात आले. तर, उपविजेत्या लायन्स स्पोर्ट्सला रोख रक्कम रु. ८ हजार १ व चषकावर समाधान मानावे लागले.

गुड मॉर्निंगचा शार्दुल पाटील याच्या दमदार चढाया आणि त्याला साहिल राणे, सर्वेश पांचाळ यांची मिळालेली बचावाची भक्कम साथ यामुळेच गुड मॉर्निंगने आपला विजय साकारला आहे. शार्दुल पाटील सामन्यातील सर्वोत्तम खेळाडू ठरला असून त्याला रोख रक्कम रू. ४ हजार ४४४ व चषक देऊन गौरविण्यात आले आहे. तसेच, लायन्सच्या राज आचार्यने उत्तरार्धात एकाच चढाईत ४ गडी टिपत सामन्यातील चुरस वाढविली होती. त्याला शुभम मटकरने उत्तम पकडी करीत छान साथ दिली. परंतु, संघाला विजयी करण्यात ते कमी पडले. गुड मॉर्निंगच्या साहिल राणे आणि लायन्सच्या राज आचार्य यांना स्पर्धेतील अनुक्रमे उत्कृष्ट पकडी आणि चढाईचे खेळाडू म्हणून निवडण्यात आले. त्यांना प्रत्येकी रोख रक्कम रू. २ हजार २२२ व चषक प्रदान करून गौरविण्यात आले.

या अगोदर झालेल्या उपांत्य सामन्यात लायन्स स्पोर्ट्सने अमर क्रीडा मंडळाला ३६-२६ असे, तर गुड मॉर्निंगने जय भारत संघाला चुरशीच्या लढतीत ३०-२९ असे पराभूत करीत अंतिम फेरीत धडक दिली होती. दोन्ही उपांत्य पराभूत संघाना प्रत्येकी रोख रक्कम रू. ५ हजार १ व चषक देऊन सन्मानित करण्यात आले. सर्व रोख रकमेची पारितोषिके लक्ष्मीबाई ठोंबरे यांच्यावतीने प्रदान करण्यात आली. यावेळी, लालबागच्या राजाचे सचिव सुधीर साळवी, नगरसेवक सचिन पडवळ, लक्ष्मीबाई ठोंबरे, जयश्री सुर्वे, स्पर्धा निरीक्षक अनिल केशव, पंच प्रमुख सुनील नवले यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे बक्षीस वितरण पार पडले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी बळीराम मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले होते.

# पेडली केंद्राची दमदार कामगिरी



**। पाली/गोमाशी। वार्ताहर ।**

सुधागड तालुकास्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा दि.१९ व २० डिसेंबर या कालावधीत वावळोली येथील अनुदानित आश्रमाशाळेत संपन्न झाल्या. तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांना वाव देणे व त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला संधी प्राप्त करून देणे या हेतूने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पेडली केंद्राने दमदार कामगिरी केली आहे.

यावेळी पेडली केंद्राने प्रथम क्रमांकाची ५ बक्षिसे, द्वितीय क्रमांकाची ४ बक्षिसे आणि तृतीय क्रमांकाची २ बक्षिसे अशी एकूण ११ बक्षिसे प्राप्त केली आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना सुधागड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सादुराम बांगारे, वरिष्ठ विस्तार अधिकारी नवनाथ साबळे यांच्या हस्ते चषक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

सर्व यशस्वी विद्यार्थी, शिक्षक वृंद व तालुका स्तरीय स्पर्धेत सहभागी शाळा यांचे केंद्रप्रमुख अनिल राणे यांनी अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# भारताच्या पोरींनी मैदान मारले

## बांगलादेशला नमवत घेतला बदला




**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

१९ वर्षाखालील आशिया चषकतातील स्पर्धेत भारतीय महिला संघाने विजेतेपद पटकावले आहे. अंतिम सामन्यात भारातीय संघाने बांगलादेशवर मात केली आणि चषकावर आपले नाव कोरले आहे. याआधी भारतीय १९ वर्षांखालील मुलांचा संघ अंतिम सामन्यात पोहोचला होता. परंतु, त्यांना बांगलादेशकडून ५९ धावांनी पराभव पत्कारावा लागला होता. मात्र, महिलांच्या स्पर्धेत भारत-बांगलादेश पुन्हा आमने-सामने आले आणि यावेळी महिला संघाने बाजी मारली.

२० षटकांच्या या अंतिम सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना ७ गडी गमावत ११७ धावा केल्या होत्या. परंतु, भारताने बांगलादेशचा डाव ७६ धावांवर गुंडाळला व सामन्यात ४१ धावांनी बाजी मारली आहे.

सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी कराताना सुरूवातीचे दोन गडी मागोमाग गमावले होते. मात्र, कर्णधार निकी प्रसाद व जी त्रिशाने तिसऱ्या बळीसाठी ४१ धावांची भागिदारी करत डाव सावरला. निकीने १२ धावांचे योगदान दिले, तर सलामीवीर जी त्रिशाने सामन्यात अर्धशतक ठोकले. तिने ५ चौकार व २ षटकारांसह ४७ चेंडूत ५२ धावांची खेळी केली. भारताने बांगलादेशला विजयासाठी ११८ धावांचे आव्हान दिले होते. मात्र, भारतीय गोलंदाजांनी बांगलदेशचा डाव १८.३ षटकांत अवघ्या ७६ धावांवर गुंडाळला. बांगलादेशच्या अवघ्या २ खेळाडूंनी दुहेरी धावा केल्या. सामन्यात आयुषी शुक्लाने बांगलादेशचे ३ गडी बाद केले. तर, पौर्णिका सिसोडिया व सोनम यादव यांना प्रत्येकी २ बळी घेण्यात यश आले. तर, जोशिथा व्हीजेला १ बळी घेता आला.

## कैंपोलियन क्लब स्पर्धेचा शुभारंभ

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रिकेट असो. आयोजित दि कैंपोलियन क्लब टी-२० नॉक-आऊट क्रिकेट स्पर्धेला दि. २३ जानेवारीपासून रायगड जिल्ह्यातील विविध मैदानांवर शुभारंभ होत आहे. रायगड जिल्ह्यातील खारघर येथील बी.पी पाटील मैदान, घरत क्रिकेट मैदान, साईसुरज मैदान, पनवेल येथील ४० प्लस गावदेवी तेंबोडे मैदान व पेण येथील छ. शिवाजी महाराज क्रीडांगणावर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील नामवंत ३२ अकॅडमी/क्लब सहभागी होणार आहेत. या स्पर्धा रंगीत कपडे व पांढऱ्या चेंडूवर आयोजित करण्यात येणार आहे. तसेच, महाराष्ट्र क्रिकेट असो. च्यावतीने घेण्यात येणाऱ्या आंतरजिल्हा निवड चाचणी टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याचा संघ या स्पर्धेतूनच निवडला जाणार आहे.

# वार्षिक खेळ महोत्सव संपन्न



**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल तालुक्यातील केवाळे येथील रामकृष्ण ॲकॅडमी इंग्रजी मिडीयम शाळेचा वार्षिक खेळ महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या ॲकॅडमीत नर्सरी ते इयत्ता १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी आपल्या खेळ प्राविण्याचे प्रात्यक्षिक दाखविले. त्यामध्ये प्रामुख्याने धावणे, रिले, कबड्डी, क्रिकेट, गोळाफेक, थाळीफेक, रस्सीखेच अशा विविध प्रकारच्या वैयक्तीक व सांघिक खेळाचे आयोजन करण्यात आले होते.

या खेळ महोत्सवाचे उद्‌घाटन ॲड. मनोज भुजबळ यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी विद्याधिराज चॅरिटेबल ट्रस्टचे व्यंकटरमण भट तसेच या कार्यक्रम ासाठी आलेले योगेश पै, उमा पै व प्रिया पै यांसह मुख्याध्यापक दिपक तावडे, मुख्याध्यापिका हर्षलता चिमणकर व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी मानवी मनोऱ्याचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. याप्रसंगी बोलताना ॲड. मनोज भुजबळ यांनी सांगितले की, यशाबरोबरच अपयश पचविण्याचे कौशल्य विकसित करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या भावी जीवनात उंच भरारी वेगळ्या क्षेत्रात मारावी यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन करण्यासाठी आपण तयार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

# एरिगसीला व्हिसा मिळण्यात अडचण

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताच्या क्रमवारीत आघाडीवर असलेल्या बुद्धिबळपटू अर्जुन एरिगसीने अमेरिकन व्हिसा मिळवण्यात येत असलेल्या अडचणींबद्दल सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे. २६ डिसेंबरपासून न्यूयॉर्क सिटीमध्ये होणाऱ्या प्रतिष्ठेच्या ब्लिट्झ आणि रॅपिड स्पर्धेसाठी त्याला वेळेत अमेरिकेत पोहोचायचे आहे. परंतु, त्याला व्हिसा मिळत नाही. सध्या एरिगसीने अमेरिकन दूतावासाकडे मदतीचे जाहीर आवाहन केले आहे.



अर्जुनने पास्टमध्ये लिहीले आहे की, मी गेल्याच आठवड्यात अमेरिकन व्हिसासाठी माझा पासपोर्ट आणि इतर आवश्यक कागदपत्र तुमच्याकडे सादर केली आहेत. कृपया माझ्या अर्जाचा त्वरित विचार करून मला व्हिसा देण्यात यावा. कारण, लवकरच मला जागतिक रॅपिड व ब्लिट्झ अजिंक्यपद स्पर्धे साठी न्यूयॉर्कला जायचे आहे असे लिहीत अमेरिकन दूतावासाला त्याने टॅग केले आहे. अर्जुन सध्या रॅपिड बुद्धिबळ प्रकारात भारताचा सर्वोत्तम खेळाडू आहे. तसेच विश्वनाथन आनंद नंतर २८०० एलो रेटिंग गुण मिळवणारा तो दुसराच भारतीय बुद्धिबळपटू आहे.

## स्मृतीचे शतक थोडक्यात हुकले

**वडोदरा :** रविवारी भारतीय महिला संघ आणि वेस्ट इंडीज महिला संघात एकदिवसीय मालिकेला सुरुवात झाली. या मालिकेतील पहिल्याच सामन्यात भारतीय संघाने दमदार फलंदाजी करत वेस्ट इंडिजसमोर मोठे लक्ष्य ठेवण्यात यश मिळवले होते. भारताने या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना ५० षटकात ९ बाद ३१४ धावा केल्या. यावेळी भारताकडून स्मृती मानधानने शानदार खेळी केली. परंतु, तिचे शतक अवघ्या ९ धावांनी हुकले.

# रायगडच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी

**। कोर्लई । वार्ताहर ।**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय मुंबई उपनगर आयोजित मुंबई विभागीय शालेय तांग सू डो स्पर्धेचे कांदिवली येथील प्रकाश कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्समध्ये शनिवारी (दि.२१) मुंबई विभागीय शालेय तांग सू डो स्पोर्ट्स क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यात मुंबई विभागात समाविष्ट असलेल्या रायगड, ठाणे, मुंबई उपनगर व शहर आदी जिल्ह्यांतील प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या खेळाडूंचा समावेश होता. यावेळी रायगड जिल्ह्यातील खेळाडूंनी दमदार लढत देत १ सुवर्ण, ५ रजत व २ कांस्यपदके पटकावली आहेत.



रायगडमधील जिल्हास्तरीय तांग सू डो क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या खेळाडूंनी विभागीय स्पर्धेत देखील दमदार लढत दिली आहे. यात तळा येथील श्री.गो.म. वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचा खेळाडू शिव हिलम याने प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच, मजगांव येथील रा.जि.प.मराठी शाळा आणि नज अकादमी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाची श्रेया काबुकर, छ. शिवाजी नुतन विद्यालयाच्या ध्रुव कळके, अमोघ दळवी, रेश्मा भोईर यांनी द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तर, काव्या नात्की व अनिह जोशी हे कांस्यपदकाचे मानकरी ठरले आहेत.

## मुंबईत अमॅच्युर ऑलंपियाचे आयोजन

# १५० आंतरराष्ट्रीय स्पर्धक; ४ हजारहुन अधिक ॲथलिट्सचा सहभाग

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आशिया खंडातील सर्वात मोठी आरोग्य आणि फिटनेस स्पर्धा, तसेच इंटरनॅशनल आरोग्य, क्रीडा आणि फिटनेस फेस्टिवल दि. २० ते २२ डिसेंबर दरम्यान मुंबईतील बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये पार पडले. यामध्ये आशिया खंडातील सर्वात मोठी बॉडीबिल्डिंग चॅम्पियनशिप स्टेडफास्ट न्यूट्रिशन प्रो शो आणि शौकीन ॲथलिट्ससाठी भारतातील सर्वात मोठी बॉडीबिल्डिंग टूर्नामेंट-अमॅच्युर ऑलंपिया या दोन प्रमुख स्पर्धांचा समावेश होता. या दोन्ही स्पर्धांना वेलनेस न्यूट्रिशन ब्रँड स्टेडफास्ट न्यूट्रिशनने प्रायोजकत्व लाभले होते. स्टेडफास्ट न्यूट्रिशन प्रो शो आणि अमॅच्युअर ऑलंपिया जगभरामध्ये बॉडीबिल्डिंग चॅम्पियनशिपसाठीची गव्हर्निंग बॉडी इंटरनॅशनल फिटनेस अँड बॉडीबिल्डिंग फेडरेशन अंतर्गत आयोजित केले गेले.




पाच वर्षांपासून स्टेडफास्ट न्यूट्रिशन आयएचएफएफचा एक महत्त्वाचा सहयोगी आहे. या ब्रँडने भारतातील फिटनेस उद्योगाला अतिशय आवश्यक असलेले प्रोत्साहन दिले आहे आणि भारतीय बॉडीबिल्डिंग ॲथलिट्ससाठी सर्वात मोठ्या जागतिक मंचावर स्पर्धेत सहभागी होण्याचा मार्ग मोकळा केला आहे. प्रो शो जिंकणाऱ्या ॲथलिट्सना जगातील सर्वात प्रतिष्ठित बॉडीबिल्डिंग स्पर्धा, मिस्टर ऑलंपिया यूएसएमध्ये थेट प्रवेश मिळतो. तीन दिवसांच्या या कार्यक्रमात १५० आंतरराष्ट्रीय स्पर्धक, ८० हजार दर्शक आणि उद्योगक्षेत्रातील दिग्गजांसह ४ हजारहुन जास्त ऍथलिट्स सहभागी झाले होते. तसेच, २०० पेक्षा जास्त प्रदर्शक असलेले हे जगातील सर्वात मोठे आरोग्य, क्रीडा आणि फिटनेस एक्स्पो ठरले.

यावेळी बोलताना स्टेडफास्ट न्यूट्रिशनचे संस्थापक अमन पुरी यांनी सांगितले की, भारत क्रीडा प्रतिभांचे पॉवर हाऊस आहे. या टुर्नामेंट्सना सहकार्य करून आम्ही जागतिक स्तरावर भारतीय ॲथलिट्सच्या यशासाठी एक सुस्पष्ट रोडमॅप बनवू इच्छितो, त्यांच्यासाठी जिंकणे ही एक सवय बनवू इच्छितो आणि भारतीय बॉडीबिल्डिंगला जागतिक मानकांपर्यंत नेऊ इच्छितो. २०४० पर्यंत भारत जगाची क्रीडा राजधानी बनावा या आमच्या दृष्टिकोनाला अनुरूप हे पाऊल उचलण्यात आले आहे. २०२२ मध्ये प्रो शो सुरु करणाऱ्या देशाचा पहिला आणि एकमेव ब्रँड म्हणून स्टेडफास्टने भारतीय ऍथलिट्ससाठी जगातील सर्वात प्रतिष्ठित बॉडीबिल्डिंग चॅम्पियनशिप-मिस्टर ऑलंपिया यूएसएमध्ये प्रवेश मिळवण्याचा मार्ग खुला केला आहे. त्यांना तिथे जिंकण्याची, पुरस्काराची रक्कम, आंतरराष्ट्रीय मान्यता आणि आकर्षक प्रायोजकत्व मिळवण्याची अनोखी संधी मिळाली आहे. अरनॉल्ड श्वार्जनेगर, फिल हेल्थ आणि डेक्स्टर जॅक्सन यासारख्या दिग्गजांनी याच मंचावर आपले लिजंडरी स्टेटस मजबूत केले असल्याचे त्यांनी सांगितले.



## चिल्हेतील क्रीडा महोत्सव उत्साहात

**। खांब । वार्ताहर ।**

रोहे तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या शिक्षण संस्थेच्या चिल्हे येथील श्रमिक विद्यालयात क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

या यहोत्सवातंर्गत विद्यार्थी वर्गाच्या सांघिक तसेच वैयक्तिक खेळांच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.तर शेवटच्या सत्रात विविध फनीगेम्स घेऊन या महोत्सवाची सांगता करण्यात आली. या महोत्सवाचे यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांनी मोलाचे सहकार्य केले. दरम्यान, संस्थेचे चेअरमन महेंद्र पोटफोडे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली या क्रीडा स्पर्धेत सर्वप्रथम सचिव कचरे व संचालक धनाजी लोखंडे यांच्या हस्ते क्रीडाज्योतीचे प्रज्वलन करून महोत्सवाला प्रारंभ करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक दिपक जगताप, नरेंद्र माळी, संजय आंधळे आदी मान्यवर उपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)